R.N.I.No.1814/57

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार ९ सप्टेंबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-१८६, पाने-८, किंमत : ₹ ५

Issue - 186 Vol.- 99 Marathi - Daily - Mumbai, 9 September - 2021 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.enavakal.com • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## कोकणातून मुंबईत परतणाऱ्यांची होणार आरटीपीसीआर

**मुंबई** - गणेशोत्सवासाठी मुंबईतून तब्बल चार ते पाच लाख भाविक कोकणात दाखल झाले आहेत. खासगी वाहने, एसटी, रेल्वे आदी विविध माध्यमातून लोक कोकणात दाखल होत आहेत. मात्र मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या मागचे शुक्लकाष्ठ संपताना दिसत नाही. कारण ज्याप्रमाणे कोकणात जाताना आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कोकणातून मुंबईत येतानाही आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे. कोकणातून मुंबईत परतत असताना प्रवाशांची स्क्रिनिंग केली जाणार आहे. या स्क्रिनिंगवेळी ज्या प्रवाशांमध्ये कोरोनाची लक्षणे आढळून येतील अशा प्रवाशांची आरटीपीसीआर टेस्ट केल्या जातील. तसेच कोरोना रुग्णाच्या संपर्कात आलेल्या लोकांच्याही पहिल्याच दिवशी आरटीपीसीआर टेस्ट केल्या जातील अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली.

## देवेंद्र फडणवीस यांची गोव्याच्या निवडणूक प्रभारीपदी नियुक्ती

**पुढील वर्षी पाच राज्यांत होणाऱ्या निवडणुकांसाठी भाजपाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाने महाराष्ट्रातील विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर गोवा विधानसभा निवडणुकीच्या प्रभारीपदी नियुक्ती केली आहे. फडणवीस यांनी महाराष्ट्रात पाच वर्षे युतीचे सरकार यशस्वीपणे हाताळले आणि बिहार विधानसभा निवडणुकीत मोलाची कामगिरी बजावल्याने भाजप नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास दाखवत ही जबाबदारी सोपवल्याचे बोलले जात आहे.**



■ मुंबई

**पुढील** वर्षात देशात उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी भाजपने आता तयारी सुरू केली आहे. मार्च, एप्रिल, मे या तीन ते चार महिन्यांच्या काळात या निवडणुका होणार आहेत. यासाठी भाजपने पदाधिकारी आणि जबाबदारी वाटपात फेरबदल केले आहेत. महाराष्ट्रामध्ये भाजपचे नेतृत्व करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर गोवा विधानसभा निवडणुकीसाठी प्रभारी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याआधी २०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये फडणवीसांनी चांगली कामगिरी केली होती. या निवडणुकीत भाजपने ७० पेक्षा जास्त जागा जिंकत संयुक्त जनता दलासह सत्ता कायम ठेवली. यानंतर आता फडणवीस गोव्यातील निवडणुकांमध्ये कशी कामगिरी करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गोव्याच्या प्रभारीपदी नियुक्ती झाल्याने फडणवीस यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचे आभार मानले आहेत. ते म्हणाले की, आमचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाने गोव्यात जे काही काम केले आहे त्याआधारे जनता पुन्हा एकदा आम्हाला निवडून देईल हा विश्वास आहे.

## भाजपा नेते किरीट सोमय्या यांना केंद्राकडून झेड सुरक्षा! ४० जवान तैनात

**भाजपा नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांच्याभोवती आता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या तब्बल ४० जवानांचे सुरक्षित कवच असणार आहे. सोमय्या यांनी गेल्या काही दिवसांत ठाकरे सरकारमधील अनेक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यानंतर आपल्याला धमक्या मिळत असल्याचा दावाही केला आणि केंद्र सरकारकडे सुरक्षेची मागणी केली. आता त्यांची ही मागणी मान्य करून मोदी सरकारने त्यांना थेट 'झेड' दर्जाची सुरक्षा पुरविली आहे. त्यामुळे आता सीआयएसएफचे ४० जवान अहोरात्र सोमय्यांच्या सुरक्षेत असतील. सोमय्यांच्या मुंबईतील घराबाहेर बॅरेक बनवून सुरक्षा रक्षकांची सोय करण्यात आली आहे.**

■ मुंबई

**किरीट** सोमय्या यांनी ठाकरे सरकारशी संबंधित ११ जणांवर घोटाळ्याचा आरोप केला आहे. यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्यापासून



मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांच्यापर्यंत आणि परिवहन मंत्री अनिल परब यांच्यापासून अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यापर्यंत ११ जणांचा समावेश आहे. ठाकरे यांचे इलेव्हन सरकार आणि उद्धव ठाकरेंसह १२ जणांचे घोटाळे दिवाळीपर्यंत उघड करणार, असा इशाराच भाजपाने दिला आहे. 'आम्ही ठाकरेंच्या धमक्यांना घाबरत नाही. आम्ही घोटाळे केले असतील तर चौकशी करा. अनिल परब प्रकरण आता सुरू आहे, भावना गवळी पुढच्या आठवड्यात आणि जितेंद्र आव्हाड तुम्हाला जाहीर आव्हान आहे, तुम्हीही बॅग भरा', असा थेट इशाराच सोमय्या यांनी दिला आहे. अशातच त्यांना सुरक्षा कवच देऊन केंद्राने 'गो अहेड' असा संदेशच दिल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, ठाकरे सरकार सत्तेत आल्यापासूनच किरीट सोमय्या यांचे अनिल परब, मिलिंद नार्वेकरांसह महाविकास आघाडीतल्या इतर नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप, तक्रारी दाखल करणे हे सुरू होते. त्यानंतर गेल्या काही दिवसांपासून आपल्याला धमक्या येत असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला होता. त्यामुळेच त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून सुरक्षेची मागणी केली होती. त्यांची ही मागणी केंद्र सरकारने तात्काळ मान्य केली आहे.

## भाजपा खासदार तडस यांच्या सुनेचा व्हिडीओ माझ्या जीवाला धोका, मला घेऊन चला

■ वर्धा

**राष्ट्रवादी** काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज सकाळी एक व्हिडीओ ट्विट केला आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या व्हिडीओत एक महिला आपल्या जीवाला धोका असून मला इथून घेऊन चला, अशी विनंती रुपाली चाकणकर यांच्याकडे करताना दिसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही महिला दुसरी-तिसरी कोणी नसून वर्ध्याचे भाजपा खासदार रामदास तडस यांची सून असल्याचे चाकणकरांनी म्हटले आहे.

रुपाली चाकणकर यांनी



ट्विट केलेल्या १२ सेकंदांच्या व्हिडीओत महिला म्हणते की, मी पूजा, रुपालीताई चाकणकर यांना मदत मागतेय, माझ्या जीवाला धोका आहे इथे, मॅडम प्लीज मला इथून घेऊन चला. मी रिक्वेस्ट करते. याबाबत बोलताना चाकणकर म्हणाल्या की, 'आज सकाळी मला माझ्या नंबरवर एक व्हिडीओ आला. त्यानंतर कॉलदेखील आला. त्यावर पूजा माझ्याशी बोलत होती तिने मला सांगितले, माझ्या जीवाला धोका आहे, मला प्रचंड त्रास होतोय. आज पोलीस स्टेशनला जाणार होते पण मी तिथपर्यंत पोहोचू नये म्हणून तडस कुटुंब कदाचित माझ्यावर जीवघेणा हल्लासुद्धा करू शकतात.' तिचा व्हिडीओ मला मिळाला तेव्हा मी तातडीने पोलीस आयुक्तांशी संपर्क साधला. »पान २ वर

## घरोघरी लसीकरणाचा आदेश देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**सध्याची** देशातील परिस्थिती पाहता घरोघरी जाऊन लसीकरण करणे शक्य नाही. त्यामुळे घरोघरी जाऊन लसीकरण करण्याचा आदेश आम्ही देणार नाही. सध्या सुरू असलेले लसीकरण योग्यप्रकारे चालले आहे, असे मत आज सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले.

विकलांग, आजारी आणि जास्त वयाच्या नागरिकांसाठी घरोघरी कोरोना प्रतिबंधक लसीकरण सुरु करण्याच्या मागणीची याचिका काही वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती हेमा कोहली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी सध्या सुरू असलेले लसीकरण योग्य प्रकारे चालले आहे. ६० टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकांचे लसीकरण झाले आहे. त्यांना किमान पहिला डोस दिला गेला आहे. असे असताना घरोघरी लसीकरण करण्याचा आदेश देऊन सरकारची लसीकरण मोहीम आम्ही संपू शकत नाही, असे सांगून अशा लसीकरणाचा आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला.

## ४ मार्चच्या रात्री लाल रंगाच्या तवेरा गाडीत मनसुख हिरेन यांची ११ मिनिटांत केली हत्या

### एनआयएच्या आरोपपत्रात विस्तृत घटनाक्रम

■ मुंबई

**उद्योगपती** मुकेश अंबानी यांचे घर अँटिलियातून जप्त झालेल्या जिलेटिनने भरलेल्या स्कॉर्पियोचे मालक मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या प्रकरणात एनआयएने आरोपपत्र दाखल केले आहे. एनआयएने दावा केला आहे की, मनसुखची हत्या बडतर्फ एपीआय सचिन वाझेच्या इशाऱ्यावरून ११ मिनिटांच्या आत करण्यात आली. मनसुख हिरेन यांना अँटिलियाबाबतच्या संपूर्ण प्रकरणाची माहिती होती. त्यामुळे हिरेन यांच्याकडून सत्य बाहेर पडेल अशी भीती सचिन वाझेला सतत वाटत होती. म्हणून त्याला



ठार मारले. एनआयएने आपल्या आरोपपत्रात हिरेन यांच्या हत्येचा कट कसा रचला आणि मग त्याची अंमलबजावणी कशी झाली. त्याच्या संपूर्ण कथेचा विस्तृत घटनाक्रम दिला आहे. ४ मार्च २०२१ च्या रात्री साडे आठ ते रात्री ९.४७ दरम्यान नेमके काय घडले त्याची माहिती आरोपपत्रात दिली आहे. रात्री ८.३० च्या सुमारास सुनील माने याने कांदिवली गुन्हे शाखेचे निरीक्षक तावडे म्हणून मनसुख हिरेन यांना व्हॉट्सॲप कॉल केला. आणि त्यांना ठाणे येथील घोडबंदर रोडवरील सूरज वॉटर »पान २ वर




## मेक्सिकोत भूकंप रस्त्यांना तडे गेले

**मेक्सिकन सिटी** - मुसळधार पावसामुळे महापुराचा तडाखा बसलेल्या मेक्सिकोला आता भूकंपाचे हादरे बसत आहेत. मंगळवारी रात्री उशिरा दक्षिण मेक्सिकोच्या अल्कापुल्को रिसॉर्ट परिसरात भूकंप झाले. त्यांची तीव्रता ७ ते ७.४ रिश्टर स्केल एवढी नोंद झाली होती. यामुळे नागरिक घाबरून

### त्सुनामीची शक्यता

घराबाहेर पडले. शहरापासून २०० मैलापर्यंत भूकंपामुळे इमारती हादरत होत्या. भूकंपामुळे ग्युरेरो राज्यात अनेक ठिकाणी रस्त्याला मोठे तडे गेले आहेत. भूकंपामुळे आता त्सुनामीची भीती निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी पावसामुळे मेक्सिकोला महापुराचा तडाखा बसला होता. त्यात अनेक जणांचे बळी गेले होते. त्यातून नागरिक सावरत असतानाच रात्री भूकंपाचे हादरे बसले. ७ ते ७.४ रिश्टर स्केल एवढी त्यांची तीव्रता भूकंपमापन यंत्रावर नोंद झाली होती. या भूकंपाचा केंद्रबिंदू ग्युरेरा राज्यातील हल्कापुल्का या समुद्र किनाऱ्यावरील रिसॉर्टपासून १४ किलोमीटरवर होता.

## मुंबई महापालिकेच्या शाळेत केंब्रिज बोर्ड सुरू करणार

■ मुंबई

**मुंबई** महानगर पालिकेच्या शाळेला पब्लिक स्कूल म्हणून संबोधण्यात येईल,अशी यापूर्वी घोषणा केल्यानंतर आता मुंबई पालिकेच्या शाळेत केंब्रिज बोर्ड सुरू करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. मुंबईच्या प्रत्येक वॉर्डात शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती पर्यटनमंत्री आणि मुंबईचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली आहे. पालकमंत्री आदित्य ठाकरे म्हणाले की, आज आपण केंब्रिज बोर्डाचा एक महत्त्वाचा पल्ला पार करत आहोत. पुढचे दोन महिने यांच्यासोबत बसून यात किती शाळा आपण घेऊ शकतो. सुरुवातीला एक शाळा जरी असेल. तरी प्रत्येक वॉर्डमध्ये कमीत कमी एक शाळा तरी करू शकू का? जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थी याचा फायदा करून घेऊ शकतील. विद्यार्थ्यांना

### आदित्य ठाकरे यांची घोषणा

करिअर, रिसर्चसाठी भविष्यात फायदा होईल. २०१३ मध्ये आपण व्हर्च्युअल क्लासरुमची संकल्पना महापालिका शाळांमध्ये प्रत्यक्षात आणण्यात आली आहे. तसेच सीबीएसई, आयसीएसई बोर्डाशीही काही शाळांची संलग्नता करण्यात आली, त्याच पद्धतीने केंब्रिज बोर्डासमवेतही संलग्नता करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## अभिनेता अक्षय कुमारची आई अरुणा भाटियांचे दु:खद निधन



**मुंबई** - हिंदी चित्रपट सृष्टीतील अभिनेता अक्षय कुमार यांची आई अरुण भाटिया यांचे आज सकाळी निधन झाले. त्या ७७ वर्षांच्या होत्या. मुंबईच्या हिरानंदानी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. तेथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अक्षय कुमारने सोशल मीडियावर ही माहिती दिली आहे. काही दिवसांपूर्वी अरुणा भाटिया यांची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे अतिदक्षता कक्षात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अक्षय कुमार यावेळी इंग्लंडमध्ये सिंड्रेला चित्रपटाच्या शूटिंगसाठी गेला होता. आईची तब्येत बिघडल्याचे समजल्यानंतर तो परत आला होता. रुग्णालयात उपचार सुरू असताना आज सकाळी माझ्या आईने शांतपणे या जगाचा निरोप घेतला. ती आता दुसऱ्या जगात माझ्या वडिलांकडे गेली. ती माझ्या आयुष्याचा केंद्रबिंदू होती.

## इंडोनेशियाच्या तुरुंगात आगडोंब ४१ कैद्यांचा मृत्यू, ३९ जखमी

■ जकार्ता

**येथून** जवळच असलेल्या तांगेरांग तुरुंगाच्या सी ब्लॉकमध्ये आज पहाटे भीषण आग लागली. त्यात ४१ कैद्यांचा होरपळून मृत्यू झाला असून ३९ कैदी भाजून जबर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या आगीच्या कारणांचा शोध घेतला जात आहे, अशी माहिती न्याय मंत्रालयाच्या सुधार विभागाचे प्रवक्ते रिका अपरीआंती यांनी दिली. जकार्तापासून काही अंतरावर असलेल्या तांगेरांग जेलची एकूण कैद्यांची क्षमता १,२२५ आहे. मात्र या तुरुंगात २ हजारपेक्षा अधिक कैद्यांना ठेवण्यात आले आहे. तुरुंगाच्या सी ब्लॉकमध्ये अंमली पदार्थांशीसंबंधित कायद्यांना ठेवले जाते. आज पहाटे या ब्लॉकला आग लागली. याची माहिती मिळताच पोलीस आणि लष्कराच्या



जवानांनी ती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. अनेक तासांच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली. मात्र या आगीत ४१ कैद्यांचा होरपळून मृत्यू झाला. याशिवाय ३९ जण जखमी झाले आहेत.

## चिपीचे श्रेय घेण्याचा राणेंना अधिकार नाही! फुशारक्या मारताना भान ठेवा

■ सिंधुदुर्ग

**चिपी** विमानतळाच्या उद्घाटनाच्या मुद्यावरून शिवसेना आणि केंद्रीय सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांच्यात जुंपण्याची शक्यता आहे. नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यातील चर्चेनुसार चिपी विमानतळाच्या उद्घाटनाची तारीख ठरली आहे. त्यामुळे नारायण राणेंना चिपी विमानतळाचे श्रेय घेण्याचा अधिकार नाही. त्यांनी उगाच फुशारक्या मारू नये, भान ठेवावे, असा हल्लाबोल शिवसेना खासदार विनायक राऊत यांनी केला आहे.



### खा. विनायक राऊत यांचा हल्लाबोल

सिंधुदुर्गात पत्रकार परिषदेत बोलताना विनायक राऊत म्हणाले की,मागील अनेक वर्षापासून चिपी विमानतळाहून विमानाचे उड्डाण कधी होतेय याची प्रतिक्षा सर्वांनाच होती. आम्ही लोकप्रतिनिधी त्याचा सातत्याने पाठपुरावा करत होतो आणि सर्वांच्या प्रयत्नातून खासकरून हे विमानतळ व्हावे यासाठी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी दोन वर्षात चार वेळा वेगवेगळ्या बैठका घेतल्या. केंद्रीय मंत्री गजपती राजू, कॅप्टन पुरी त्याआधी सुरेश प्रभू आणि आता ज्योतिरादित्य शिंदे अशा चार हवाई वाहतूक मंत्र्यांसोबत बैठका घेतल्या. मी मागील सात वर्ष एव्हिएशन कन्सल्टींग कमिटीमध्ये हा मुद्दा सातत्याने लावून धरला होता. या सर्व प्रयत्नाला यश येऊन सिंधुदुर्ग विमानतळावरुन अगदी नियमितपणे हवाई वाहतूक सुरु करण्याचे »पान २ वर

## रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीमध्ये वाढ

**नवी दिल्ली** - केंद्र सरकारची बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत २०२२-२३ या वर्षासाठी रब्बी पिकांची किमान आधारभूत किंमत वाढवण्याचा निर्णय झाला तसेच गहू, हरभरा, मसूर, सूर्यफूलांच्या किंमतीत केंद्र सरकारने वाढ केली. गव्हाची किमान आधारभूत किंमत ४० रुपयांनी वाढवून प्रति क्विंटर २ हजार १५ रुपये इतकी केली आहे. इतर सर्व प्रमुख रब्बी पिकांच्या किंमतीतही वाढ केली. मोहरीच्या किमान आधारभूत किंमतीमध्ये ४०० रुपये प्रति क्विंटल अशी वाढ केली आहे.

शुभ राशी ४ ७ ८

## नाशिकच्या योगेश टिळेने साकारली 'व्हॅक्सिन बाप्पा'ची मनमोहक मूर्ती

■ नाशिक

**गणेशोत्सवात** सामाजिक बांधिलकी आणि जनजागृती करण्याचे काम नेहमी केले जाते. त्यामुळे त्या-त्या वर्षात घडणाऱ्या घडामोडींचे प्रतिबिंब गणेशोत्सवावर दिसते. तसेच यंदा नाशिकचे मूर्तीकार योगेश टिळे यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर समाजात अनोखा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी 'व्हॅक्सिन बाप्पा'चे आगळेवेगळे रूप साकारले आहे. लस, सीरीज, मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करून जनजागृती करण्याचा आणि कोरोनापासून सुरक्षित राहण्याचा संदेश



दिला आहे. लसीकरण, मास्क, सॅनिटायझर आणि सामाजिक अंतर असे नियम पाळून कोरोनाचे विघ्न दूर ठेवता येते. मात्र लसीविषयी अजूनही लोकांमध्ये गैरसमज आहेत. उदासीनता आहे. ती लक्षात घेऊन गणेशोत्सवातून प्रबोधन करण्याच्या हेतूने मूर्तिकार योगेश टिळे यांनी व्हॅक्सिन बाप्पा साकारला आहे. हातात व्हॅक्सिन, सीरींज, मास्क आणि सॅनिटायझर या आयुधांचा वापर केला आहे. सव्वा फूट उंचीची शाडूच्या मातीची ही मूर्ती कॉलेज रोड येथील स्टॉलवर ठेवण्यात आली आहे. ती गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेते. यापूर्वी २०१९ मध्ये त्यांनी हेल्मेट बाप्पा साकारले होते. त्यानंतर आता व्हॅक्सिन बाप्पा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# छोट्या जाहिराती


संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी/ बेबीकेअर/ जापाबाई (बायका/ मुली) पाहिजेत. 'कुमारसर' दादर **9326923568** अंधेरी **8928055048/ 9076326174** {NCC210925}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (Thane) {NC210534}

टिकली, अगरबत्ती, साडीपिन, फुलवात, कुंकू, बॅग पॅकिंग रोज १५००/-कमवा माल फ्री घरपोच समर्थ उद्योग कल्याण (वेस्ट) : **9920213276/ 8657118861** {NC210019}

अर्जंट पाहिजेत घरबसल्या लिखाणकाम महिना 25000-30000/- कमवा -**9702961502** {NCC210845}

मुंबईमध्ये 12/24 तासासाठी घरकाम/ पेशंटकेअरसाठी आया, नर्स, वॉर्डबॉय, बेबीकेअर, हाऊसमेड पाहिजेत. पगार (15,000-72,000) **9833470117 / 9820628009** {NCC210874}

TISSUE पेपर बॉक्सच्या मार्केटींगसाठी सेल्समॅन पाहिजे. ए-२८, घाटकोपर इंडस्ट्रियल इस्टेट, आर. सिटी. मॉलजवळ, घाटकोपर (प.), मोबाईल न.- **9821523009** {NCC210901}

इलेक्ट्रीकल कंपनीला अनुभवी वायरमेन आणि हेल्पर पाहिजेत. बोरीवली **8291286227/ 8452810043** {NC210512}

हाऊसकिपींगसाठी अनुभवी मुले/ मुली पाहिजेत. पगार- 9000/-. संपर्कः **8422842261/ 8108106913** {NC210513}

TAJ कंपनीत मुले-मुली भरती, कमवा 13500/--25000/- राहणे फ्री अंधेरी (WEST) **9967362303** {NCC210902}

अर्जंट पाहिजेत सिक्युरीटी गार्ड, ऑफीस बॉय, हाऊसकिपिंग, बेबीकेअर **9028100234** {NCC210924}

लॉजिस्टिक कंपनीला मुंबई आणि भिवंडीसाठी TATA-ACE, Mahindra Jiyo आणि ट्रकसाठी अनुभवी, शिक्षित ड्रायव्हर पाहिजेत. आकर्षक पगार भेटा- Unique Air Freight, 2A, प्लॅनेट इंडस्ट्रीयल इस्टेट, युनायटेड इंकसमोर, ऑफ सुभाष रोड, गरवारेच्या पाठीमागे, विलेपार्ले (पूर्व) {NCC210919}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरिता अनुभवी ऑपरेटर्स पाहिजेत. चांगला पगार. संपर्क - **25325762 / 9820683431** {NCC210535}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. (मालाड वेस्ट) - **8450931541** {NC210533}

बंगलोरमध्ये २४ तास घरकाम/बाळाला संभाळण्यासाठी बाई /मावशी पाहिजे. पगार 22000/- जेवण /राहणे /सुरक्षित प्रवासाची सुविधा **9867728565 / 9867476215.** {NC210532}

24 तास घरकाम पेशंटकेअर महिला पाहिजे. (जेवणाची राहण्याची सोय) 'स्मिता हाऊस सरवेन्ट एजन्सी' भांडूप - **8879385402, 9867770184.** {NCC210880}

घाटकोपर येथील बँकेत ऑफिस बॉय, कलेक्शन बॉय, हाऊसकिपिंग पाहिजेत. HR - **8424076052** {NCC210907}

घरी बसून लिखाण काम ७ दिवसांचा पगार 15000/- साक्षी **8591555848** {NC210536}

ऑफसेट प्रिंटिंग युनिटसाठी मार्केटिंग मॅनेजर/एक्झिक्युटिव्ह/ टेलीमार्केटिंग पंचिंग, लॅमिनेशन ऑपरेटर, **(022) 49741218 / 8779203935** {NC210540}

अंधेरी पूर्वसाठी हेल्पर्स पाहिजेत. पगार 10,500/- फोन - **9619291288 / 9892258636** {NCC210940}

**हेडलबर्ग UV आणि ड्रिपऑफ ऑपरेटर्स, भांडूप येथे पाहिजेत. संपर्काची वेळ 10 ते 6. 9833634666.** {NC210539}

कंपनीला ड्रायफुट, फरसाण, बुक, गारमेंट, पॅकिंग, हेल्पर, सिक्युरीटी मुला-मुलींची परमनंट भर्ती कमवा. 12500-25000/- शिक्षण नाही राहणेची सोय- **8291353332** {NCC210938}

शिवडी, अंधेरीसाठी मोटरसायकल असलेले डिलिव्हरीबॉईज पाहिजेत. पगार 13000/- + पेट्रोल अलाऊंस + इन्सेटिव **8007527833** {NCC210941}

स्टिकर मॅन्युफॅक्चरींग कंपनीला स्क्रिनप्रिंटर पाहिजे. स्टिक प्रिंट, चंद्रछाया आर्केडजवळ,म्हात्रे कंपाऊंड, ललितकाटा, मानपाडा, डोंबिवली (पूर्व) मोबाईल - **9819585325** {NCC210941}

बोरीवलीला पोळीभाजी केंद्रासाठी मोरीवर कामगार पाहिजे. राहण्याची सोय. **9326477853 / 9224173496** {NCC210943}

## पाहिजेत

मालाड (ईस्ट) स्टेशन जवळ पुरुष / स्त्री टेलीकॉलर पाहिजेत. पगार 8-10 हजार पर्यंत. मराठी बोलायला सक्षम. वय 30 खाली. **9222222248** {NC210543}

साफसफाई कामासाठी मुलगा सकाळी 7 ते 3/ रु. 7500/- + पास भेटा लक्ष्मी - लॉज माहेश्वरी उद्यान, माटुंगा (पूर्व) {NCC210946}

मुंबईमध्ये बेबीकेअर, पेशंटकेअर, घरकामासाठी मुली, बाई पाहिजेत राहणे खाणे फ्री पगार १५ ते २० हजार फो.: **9819339480/ 9819447254** {NCC210829}

Ltd. कंपनीला सेल्स मुले, मुली पाहिजेत. महिना 20000 ते 50000, संपर्क - **8452802356.** {NCC210873}

कुरीयर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. ॲशियानेट लॉजिस्टिक बी-५, शुभम सेंटर नं.१, कार्डियल ग्रॅसियस रोड, चकाला, अंधेरी (ईस्ट)- **8169050216** {NC210505}

भिवंडीमध्ये मेक्सीमा ऑटोमॅटीक पंचिंग मशीनसाठी अनुभवी व हुशार ऑपरेटर पाहिजे. शिला आर्ट पॅकेजिंग, भुमी वर्ल्ड, फ ५/२१-२२-२३-२४. पिंपळास विलेज, टाटा आमंत्रासमोर, भिवंडी-४३१३०२. टेल. नं. **8767769830/ 2522297810**. {NCC210949}

दादरमधील साडी, कुर्ती, ड्रेस शोरूमसाठी अनुभवी/ बिनअनुभवी २०-४० वयापर्यंतच्या स्मार्ट, सुशिक्षित सेल्सगर्ल पाहिजेत. 'अनुली' टिळक ब्रिज सिग्नलजवळ, दादर (वेस्ट) {NCC210552}

## Situation Vacant

Wanted delivery boys. Alfa Om International, Thakurdwar, Girgaon Charni Road east. Contact **9321237742** {NC210538}

Keetnash Services Required Pest control Technician (boys) For Servicing, Good salary Location at Chembur Mumbai Contact: **9869004045/ 9757224506** {NCC210947}

Fly High Facility urgent required Field Executive. Collection, Recovery, Telecaller need DRA Certificate. No placement, permanent job. **9082865294.** {NC210553}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, BTECH, B.ED **9168088740** {NCC210356}

## नर्सिंग कोर्स

30,000 पर्यंत (ट्रेनिंगनंतर) मोफत (सुरक्षा ठेव) GNM / ANM / आयुर्वेद नर्सिंग, दहावी (पास/ नापास) क्रिस्टल हॉस्पिटल **8976878444** {NC210489}

100% नोकरी देणारे गव्हर्मेंट सर्टिफाईड GNM / ANM NURSING ASSISTANT, DMLT, OT, ICU, XRAY. DIALYSIS, OPTOMETRY, PHYSIOTHERAPY ''ओमइन्स्टिट्युट'' **8080502190 / 9820258768 / 7666617771** {NCC210347}

## व्यवसायविषयक

सीएफएल/एलईडी बल्ब जोडणीचे काम करून १ लाखापर्यंत उत्पन्न मिळवा.-**8788254775, 94228 50593** {NC210407}

## गुंतवणूकविषयक

गुंतवणूक तुमची सुरक्षेची हमी आमची. Share मार्केटमध्ये गुंतवणूक करा व महिना (१०+५)= १५% कमवा. अधिक माहितीसाठी संपर्क करा. **7304223995, 8591847257** {NC210549}

## वधू पाहिजे

वर ३३, एम.बी.ए., स्वतःचा व्यवसाय, स्वतःचे घर, प्रथम वर ९६ के, अपेक्षा अनुरूप ग्रॅज्युएट सायन्स/इंजिनियर. संपर्क- **9869201970** {NC210550}

## ज्योतिषविषयक


सागर ज्योतिष मराठी जन्मकुंडली स्पेशालिस्ट गुण - मिलन, पुजापाठ कुंडली रु. 151/- 201 जुईनगर (नवीमुंबई) **9870126299** {NCC210929}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **मॅनेजर, 'नवाकाळ'**


## रोनी स्क्रूवाला

**रोहिंटन** सोली रोनी स्क्रूवाला म्हणजेच रोनी स्क्रूवाला. त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १९६२ रोजी मुंबई येथे एका पारसी परिवारात झाला. मनोरंजन आणि माध्यम क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती म्हणून रॉनी स्क्रूवाला हे महत्त्वाचं नाव! रॉनी स्क्रूवाला हे पहिल्या पिढीचे उद्योजक आहेत. दोन दशकांहून अधिक काळात त्यांनी काही यशस्वी (आणि काही अयशस्वी) व्यवसायांची उभारणी केली आहे. बॉलिवुडचे चित्रपट असो, मालिका असो की टीव्ही चॅनल्स ग्रुपचे नाव तुम्ही पाहिले, ऐकले नक्कीच असेल. हा ग्रुप आज भारतातील सर्वात मोठा मीडिया ग्रुपपैकी एक आहे. या ग्रुपला शून्यातून शिखरापर्यंत नेण्यात अर्थातच ग्रुपचे संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर रॉनी स्क्रूवाला यांना जाते. रोनी स्क्रूवाला हे १९९० साली स्थापन झालेल्या यूटीवी मीडिया समूहाचे (यूटीवी सॉफ्टवेयर कम्नुनीकेशन,



ब्लूमबर्ग यूटीवी वयूटीवी मोशन पिक्चर्स) संस्थापक व सीईओ आहेत.

यूटीव्हीची सुरुवात करण्यापूर्वी रॉनी स्क्रूवाला हे मुंबईत केबल ऑपरेटर होते. केबल व्यवसायातून पैसा कमवून रॉनीनी शॉर्ट फिल्म आणि जाहिरात विश्वास पाऊल ठेवले. ज्यात त्यांना मोठे यश आले. काही काळातच त्यांचा व्यवसाय वाढत गेला व त्यांनी पुढे यूटीव्ही पिक्चर्सची स्थापना केली. २००४ मध्ये, यूटीव्हीने भारतीय टीव्ही चॅनेल हंगामा टीव्हीच्या सहकार्याने एक हिंदी मुलांचा चॅनेल तयार केले. जो की लवकरच मुलांच्या वाहिन्यांमधील जगातील सर्वात मोठे चॅनेल बनले. फेब्रुवारी २०१२ मध्ये द वॉल्ट डिज्नी कंपनीने यूटीव्हीला टेक ओवर केले. ज्यानंतर रॉनी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर बनले तर सिद्धार्थ रॉय कपूर यांना सीईओपदी नियुक्त केले गेले. रॉनी स्क्रूवाला यांनी २०१४ मध्ये आपले नवीन प्रॉडक्शन हाऊस सुरू केले. आणि लव्ह पर स्क्वेअर फूट, लस्ट स्टोरीज, कारवां, केदारनाथ, उरी द सर्जिकल स्ट्राइक, सोनचिडिया, द स्काई इज पिंक यांसारखे चित्रपट बनवून ते सतत प्रगती करत आहेत. त्यांच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये बनलेला आदित्य धरचा 'उरी- द सर्जिकल स्ट्राइक' हा चित्रपट आतापर्यंतचा सर्वात मोठा हिट चित्रपट आहे. पुढे त्यांनी 'रश्मी रॉकेट', 'सॅम माणेकशॉ', 'तेजस' आणि 'पिप्पा' यासह आणखी काही नवीन चित्रपटांची घोषणा केली. प्रो कबड्डी लीगमध्ये खेळणारी यूमुम्बा (मुंबई) कबड्डी टीमचा रॉनी सहमालक आहेत. त्याची टीम पहिल्या कबड्डी लीगमध्ये उपविजेती ठरली होती. सध्या महाराष्ट्रात रॉनी 'शेयर' नावाची एक एनजीओही चालवतात. जी ग्रामीण भागाच्या विकासासाठी काम करते.

संजीव वेलणकर, पुणे

# मनसुख हिरेन यांची ११ मिनिटांत केली हत्या

पान १ वरून

पार्कजवळ भेटण्यासाठी बोलावले. यानंतर मनसुख हिरेन आपल्या दुकानातून घरी गेले. त्यांनी आपल्या पत्नी बिमलाला सांगितले की ते घोडबंदर रोडला कांदिवली गुन्हे शाखेचे निरीक्षक तावडे यांना भेटण्यासाठी जात आहे. घरातून बाहेर पडताना मनसुखने ऑटो रिक्षा घेतली आणि सूरज वॉटर पार्कजवळ पोहोचले. तेथे सुनील माने आधीच पांढऱ्या रंगाच्या पोलो कारमध्ये मनसुख हिरेनच्या येण्याची वाट पाहत बसला होता.आपली हत्या होणार आहे याची थोडीही कल्पना नसलेले मनसुख हिरेन आले आणि ड्रायव्हरच्या बाजूच्या सीटवर बसले . त्यानंतर मानेने गाडी घोडबंदर रोडवरील फाऊंटन हॉटेलच्या दिशेने चालवायला सुरुवात केली. यावेळी कारमध्ये माने आणि हिरेन दोघेच होते. रात्री सव्वा नऊच्या सुमारास माने आणि हिरेन सुरेखा हॉटेलजवळ पोहोचले. कार तिथेच थांबवण्यात आली. ७ मिनिटांनंतर रात्री ९:२२ च्या सुमारास लाल रंगाची तवेरा कार आधी त्याच ठिकाणी थांबते. नंतर ती यू-टर्न घेते आणि सुरेखा हॉटेल आणि द्वारका हॉटेलच्या विरुद्ध दिशेने म्हणजे ठाण्याच्या दिशेने थांबते.

माने आणि हिरेन रात्री ९.३६ वाजता लाल रंगाच्या तवेरा कारजवळ येतात. पांढऱ्या पोलो कारमध्ये स्वार होऊन. त्यानंतर सुनील मानेने मनसुख हिरेन यांना लाल रंगाच्या तवेरा कारमध्ये बसण्यास सांगितले. तवेरा गाडीतील लोक सुरक्षित ठिकाणी घेऊन जातील, असे आश्वासन हिरेनला माने देतो आणि त्याच्याकडील मोबाईल फोन माने काढून घेतो.

मनसुख हिरेन पांढऱ्या पोलो गाडीतून उतरून लाल रंगाच्या तवेरा कारमध्ये चालकाच्या मागच्या सीटवर बसतात. हिरेन मध्यभागी बसताच एका बाजूला संतोष शेलार आणि दुसऱ्या बाजूला आनंद जाधव येऊन बसले. सतीश मोथकुरी उर्फ तन्नी आधीच या सीटच्या मागे बसले होते. हिरेन बसताच सतीशने सर्व शक्तीने त्याचे डोके धरले आणि रुमालाने तोंड आणि नाक झाकले. त्यामुळे हिरेन यांना श्वास घेता येणार नाही. हिरेन यांच्या प्राणघातक हल्ला सुरु केल्यावर हिरेन यांनी बचावामध्ये विरोध करण्यास सुरुवात केली. तेव्हा त्याच्या शेजारी बसलेल्या शेलार आणि जाधव यांनी त्यांचे दोन्ही हात घट्ट धरले. त्यामुळे त्यांना स्वतःचा बचाव करता आला नाही. कोणत्याही प्रकारचा आवाज करू शकला नाही. या संधीचा फायदा घेत मागील सीटवर बसलेल्या सतीशने त्याच्या दोन्ही मित्रांच्या मदतीने हिरेनची हत्या केली. रात्री ९.३६ ते ९.४७ च्या दरम्यान लाल रंगाच्या तवेरा कारमध्ये मनसुख हिरेनची हत्या करण्यात आली. मनीष सोनी हत्येच्या वेळी कार चालवत होता. घोडबंदरवरील सुरेखा हॉटेल आणि द्वारका हॉटेलच्या समोर काही ठिकाणी हे हत्याकांड घडले. मनसुख हिरेनचा खून केल्यानंतर मनीष सोनीने रात्री ९.४७ वाजता पुन्हा लाल तवेरा गाडी चालवायला सुरुवात केली आणि रात्री १०.३० वाजता ठाणे-भिवंडी रस्त्यावरील काशेली ब्रीज गाठली. तेथे शेलार, जाधव आणि सतीश यांनी मिळून गाडीतून हिरेन यांचा मृतदेह गाडी बाहेर काढला आणि नंतर पुलावरून खाडीत फेकून दिला आणि त्याची त्याची विल्हेवाट लावली. ५ मार्च २०२१ रोजी हिरेनचा मृतदेह काशेली पुलापासून एक किमी अंतरावर मुब्रा परिसरातील रेतीबंदर येथे सापडला. मनसुख हिरेनचा मृतदेह खाडीत टाकण्यापूर्वी तिन्ही आरोपींनी त्याच्याकडून सर्व सामान बाहेर काढले होते. जेणेकरून त्याची ओळख उघड होऊ नये.

मनसुख हिरेनच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यानंतर संतोष शेलार याने रात्री १०.४७ वाजता प्रदीप शर्मा यांना फोन केला. हिरेन यांच्या खुनाची संपूर्ण माहिती शेलारने दिली. त्यानंतर ५ मार्च रोजी दुपारी १.३० वाजता जाधवने गुन्ह्यात वापरलेली लाल रंगाची तवेरा कार त्याच्या मालकाला परत केली आणि एक हजार रुपये भाडे म्हणून दिले.

त्यानंतर प्रदीप शर्माच्या सांगण्यावरून अटक टाळण्यासाठी शेलार, सतीश आणि सोनी मुंबईहून दिल्लीला गेले. तिन्ही आरोपी १०-११ मार्चपर्यंत दिल्लीच्या पहाडगंज भागात राहिले आणि तेथून लखनऊ मार्गे नेपाळला गेले. नेपाळमध्ये ४ दिवस राहिल्यानंतर तिघेही दिल्लीला परतले. येथून अहमदाबादला गेले आणि नंतर परत मुंबईला आले. मनीष सोनी हा मनसुख हिरेन खून खटल्यातील सर्वात कमकुवत दुवा होता. त्यामुळे प्रदीप शर्माच्या सूचनेनुसार शेलारने त्याला विमानाचे तिकीट देऊन दुबईला पाठवले. असे एनआयएच्या आरोपपत्रात म्हटले आहे.

दरम्यान, ०४ मार्च रोजी मनसुख हिरेनच्या हत्येतील आपला सहभाग सिद्ध होऊ नये म्हणून सचिन वाझेने डोंगरी परिसरातील टिप्सी बारवर मुद्दाम त्याच रात्री छापा टाकला. याशिवाय नागपाडा परिसरात रात्रीच्या जेवणासाठी टेबल बुक केले. बारवर छापा टाकल्यानंतर एका साक्षीदाराचे दुकानही उद्ध्वस्त झाले. ०५ मार्च रोजी मनसुख हिरेनचा मृतदेह मुंब्राच्या रेतीबंदर भागातील खाडीतून सापडला. तपासादरम्यान, मृत हिरेनची पत्नी बिमला यांनी आपल्या पतीची हत्या सचिन वाझेने केली असा आरोप ठाणे एटीएससमोर केला. ०८ मार्च रोजी केंद्र सरकारने या प्रकरणाचा तपास एनआयएकडे सोपवला. २० मार्च रोजी केंद्र सरकारने मनसुख हिरेन हत्या प्रकरणाचा तपास एनआयएकडे सोपवला. २१ मार्च रोजी मनसुख हिरेनने विक्रोळी पोलीस ठाण्यात महिंद्रा स्कॉर्पियो कार चोरल्याप्रकरणी एफआयआर दाखल केला. त्याचा तपासही एनआयएकडे सोपवण्यात आला. याआधी २५ फेब्रुवारी रोजी गांवदेवी पोलिसांनी उद्योगपती मुकेश अंबानी आणि त्यांची पत्नी नीता अंबानी यांना धमकी देणारे पत्र महिंद्रा स्कॉर्पियो कारमधून जप्त केले. त्याच कारमध्ये २० जिलेटिनच्या कांड्याही सापडल्या होत्या. या महिंद्रा स्कॉर्पिओ कारवर लावलेली नंबर प्लेट बनावट असल्याचे निष्पन्न झाले. कारण प्रत्यक्षात त्या नंबरची रेंज रोव्हर कार कॉन्व्होची होती.

# चिपीचे श्रेय घेण्याचा राणेंना अधिकार नाही

पान १ वरून

निश्चित झाले आहे. कालच मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्याशी सकाळी ठिक ११ वाजता दूरध्वनीद्वारे चर्चा केली आणि नेमका जो दिवस नक्की करायचा होता तो निश्चित झाला. तो दिवस आहे ९ ऑक्टोबर २०२१ नवरात्रौत्सवाचा तिसरा दिवस. त्या दिवशी सकाळी १२ वाजता मुंबईहून टेकऑफ घेतले जाणार आहे व येथे १.१० वा. उतरेल. पुन्हा १.३५ वा. या विमानाचे मुंबईसाठी उड्डाण होणार आहे. ७२ सीट असलेले हे विमान असणार आहे. हे विमान मुंबईत ६ तारखेलाच आले आहे. एक एअरक्राफ्ट पुढच्या आठवड्यात आणले जाईल, असेही राऊत म्हणाले. ते पुढे म्हणाले की, काही अज्ञान माणसाला कळत नाही. त्यांना इंग्रजी समजत नाही. त्यामुळे मी तुम्हाला सांगितले. हा एअरपोर्ट एमएमआयडीसीचा आहे. पीपीपी मॉडेलवरील आहे. तो महाराष्ट्राचाच आहे. केंद्राने केवळ लायसन्स दिले आहे. हा प्रकल्प पूर्णपणे महाराष्ट्राचाच आहे. आता जे बडेजाव मारतात फुशारकी मारतात ते म्हणतात मुख्यमंत्र्यांना बोलवण्याची गरज नाही. तुम्ही कोण सांगणारे. तुम्हाला कोणी अधिकार दिला. काही माहीत नसेल तर चार लोकांना विचारा. सोयीसाठी अमित शहांना विचारा. तुम्हाला काय अधिकार? काल टिंगूमिंगू सांगत होते बाप असावा तर असा. असावा. पण तो आयत्या बिळावरचा नागोबा नसावा, अशी खोचक टीकाही यावेळी राऊत यांनी केली.

# भाजपा खासदार तडस यांच्या सुनेचा व्हिडीओ

पान १ वरून

माझ्या महिला पदाधिकाऱ्यांशीही संपर्क साधला. ती ज्या ठिकाणी आता आहे तिथे पोलीस आणि माझ्या महिला पदाधिकारी पोहोचल्या आहेत. तिला पूर्णपणे संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिसांनी आणि महिला पदाधिकाऱ्यांनी घेतलेली आहे. याबाबत माहिती घेतली तेव्हा माझ्या लक्षात आले, वर्ध्याचे भाजपा खासदार आहेत रामदासजी तडस, त्यांचे कुटुंबीय आणि त्यांचा मुलगा पंकज. हे गेले अनेक दिवसांपासून तिला मारहाण करतात आणि प्रचंड मानसिक त्रास दिला जातो. त्यामुळे मला आवर्जून सांगायचे आहे की, भाजपाचे खासदार आणि त्यांचे कुटुंबीय ज्यापद्धतीने या महिलेला मारहाण करतात, आता तिची अवस्था पहिली तर ती कोणत्याही मानसिक स्थितीत नाही, ती घाबरलेली असून बोलूही शकत नाही. त्यामुळे माझी पोलीस प्रशासनाला विनंती आहे की, आपल्याकडे यापूर्वी त्यांनी जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीच्या अनुषंगाने किंवा आतासुद्धा आपण तिची तक्रार नोंद करून घ्यावी आणि आरोपींवर कडक कारवाई करावी. आपण केंद्रात खासदार म्हणून काम करताय आणि आपल्या घरातील सुनेला जर अशापद्धतीने त्रास देत असाल तर हे फार निंदनीय आहे. शेवटी लोकशाही आहे. लोकशाहीत आरोपी हा आरोपी आहे. त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई व्हावी, ही मागणी मी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने करतेय.

दरम्यान, रामदास तडस यांनी याबाबत बोलताना, माझा मुलगा आणि सून लग्नानंतर कुटुंबापासून वेगळे राहतात. त्यांची वैयक्तिक नवरा-बायकोची भांडणं असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की०, 'मी २००६-२०२० रोजी माझ्या मुलाला, पंकज तडसला घरातून आणि प्रॉपर्टीतून बेदखल केले. त्याने घरच्यांना कोणलाही काही न सांगता, न विचारता ऑक्टोबरमध्ये पूजा या मुलीसोबत लग्न केले. लग्नानंतर ते वर्ध्याला राहू लागले, चांगले राहत होते. मात्र अचानक एक दिवस मुलीचे वडील, आई, जावई आणि बहीण हे माझ्या घरी तिला घेऊन आले. त्यावेळी पंकज आणि तिच्यात वाद झाला. मी वर्ध्याला होतो. मला पत्नीचा फोन येताच मी तत्काळ पोलिसांना फोन लावून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पूजा आमच्याकडे २ महिने राहिली, मुलीसारखी राहिली. मात्र मीच तिला म्हटले, तू आता पंकजसोबत नांद, त्याच्याकडे जा. मात्र ती वर्ध्याला न जाता तिच्या घरी गेली आणि तिथून रामनगर पोलीस स्टेशनमध्ये गेली. परंतु चौकशीनंतर यात काही तथ्य नसल्याचे पत्र पोलिसांनी दिले. त्यानंतर मुलगी तिच्या घरी राहत होती आणि मुलगा वर्ध्याला. मात्र तीन-चार महिन्यांनंतर त्यांच्यात का वाद झाले मला माहित नाही', असे रामदास तडस यांनी सांगितले. तसेच दुसर्यांचे घर जुळवण्यापेक्षा विरोधी पक्षाने यात राजकारण करावे, हे आमचे दुर्दैव आहे, असे त्यांनी सांगितले.

# राशी भविष्य

संजय मनोहर

गुरुवार, दि. ९ सप्टेंबर २०२१

**मेष :** व्यवहारात सतर्क राहणे गरजेचे ठरेल. नवीन जबाबदाऱ्या अंगावर पडतील. संततीसाठीचा खर्च वाढेल.

**वृषभ :** जुनी येणी वसूल होतील. थोडे मनाजोगते वागाल. किरकोळ गोष्टींमुळे येणारी निराशा टाळावी.

**मिथुन :** संगतदोषामुळे अडचणी वाढू शकतात. भावनिकतेने झटपट निर्णय घेणे टाळावे. प्रवास कार्यसाधक होतील.

**कर्क :** अडचणीस पैशाची मदत होईल. अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. वैयक्तिक कला, छंद जोपासाल.

**सिंह :** हितशत्रूंचा त्रास संभवतो. अपेक्षेपेक्षा खर्च अधिक होईल. मित्रांबरोबर मनोरंजन, करमणूकीचा आस्वाद घ्याल.

**कन्या :** बोलण्यावर थोडा संयम ठेवणे गरजेचे ठरेल. जोडीदाराचा कल पाहून वागणे आवश्यक आहे. प्रवासात सतर्क राहावे.

**तूळ :** अडकून राहिलेली जुनी येणी वसूल होतील. अपेक्षित यशप्राप्ती होईल. जोडधंद्यातून चांगली प्राप्ती संभवते.

**वृश्चिक :** धैर्य व विवेकाने वागणे, निर्णय घ्याल. कामाचा उरक वाढवावा लागेल. शासनाची, बँकेची कामे मार्गी लागतील.

**धनु :** नात्यामधील जुनी कटुता विसरून नवे व्यक्तिसंबंध प्रस्थापित होतील. कमी श्रमात अधिक लाभ संभवतो. दिवस आनंदी.

**मकर :** योग्य संवादाने प्रश्न सोडवू शकाल. कुठल्याही बाबतीत आत्मविश्वास कमी होणार नाही, हे पाहावे. सत्संग लाभेल.

**कुंभ :** गैरसमजापासून दूर राहावे. काहींना अचानक धनलाभाचे योग. व्यवहारात मध्यस्थी करणे फायद्याचे ठरेल.

**मीन :** दूरस्थ मित्र, नातेवाईक भेटतील. व्यवसायात अपेक्षित यश संभवते. घडणाऱ्या घटनांमुळे नवीन प्रेरणा व दिशा मिळेल.

# लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध वीकली लॉटरी

सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु.20/- • सोडत दिनांक 08/09/2021

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- GL-10 : 2478

दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1670 | 2307 | 3033 | 3440 |
| 1149 | 1680 | 2405 | 3056 | 3541 |
| 1248 | 1694 | 2614 | 3144 | 3634 |
| 1422 | 1854 | 2658 | 3159 | 3693 |
| 1510 | 1883 | 2724 | 3273 | 3694 |
| 1666 | 2262 | 2755 | 3374 | 3903 |
| | 2268 | 2761 | 3432 | 3938 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.1000x5 = रु.5000 ची अंदाजित 21 बक्षिसे जिंकली

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत संध्या. 5:00

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु.10/- • सोडत दिनांक 08/09/2021

| बक्षिस | जिंकले (सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी) | बक्षिस |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG03 : 1269 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4780 रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6118 रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 5429 रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1509 | 2246 | 3233 | 3830 | 4494 | 5203 | 6415 |
| | | 1526 | 2559 | 3287 | 3883 | 4528 | 5303 | 6529 |
| | | 1722 | 2622 | 3325 | 4107 | 4570 | 5361 | 6633 |
| | 1148 | 1823 | 2789 | 3333 | 4225 | 4933 | 5517 | 6649 |
| 1095 | 1171 | 1832 | 2870 | 3356 | 4254 | 4977 | 5726 | 6654 |
| 1101 | 1255 | 1894 | 3000 | 3394 | 4454 | 4984 | 5805 | 6656 |
| 1117 | 1373 | 2179 | 3131 | 3446 | 4470 | 4999 | 6178 | 6706 |
| 1121 | 1402 | 2209 | 3132 | 3688 | 4480 | 5118 | 6388 | 6966 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री मासिक सोडत

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत क्र. 07 सोडत दिनांक 08/09/2021

| मालिका | MS-2107 A | MS-2107 B | MS-2107 C | MS-2107 D | MS-2107 E |
|---|---|---|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 25 लाख | — | — | — | 25986 | — |
| दुसरे बक्षिस रु. 5 लाख | — | — | 53836 | — | — |
| तिसरे बक्षिस रु. 1 लाख | व्यास एजन्सी - जळगाव | | | | 14150 |
| चौथे बक्षिस रु. 10000/- | 2274 | 5188 | 0277 | 2216 | 2612 |
| पाचवे बक्षिस रु. 5000/- | 0627 | 2074 | 4463 | 9924 | 4368 |
| सहावे बक्षिस रु. 2000/- | 1805 | 2364 | 6401 | 1894 | 2129 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षिस रु. 1000/- | 1002 | 1949 | 4770 | 4862 | 5068 | 5595 | 5926 | 8679 | 9397 | 9504 |
| आठवे बक्षिस रु. 500/- | 0163 | 1403 | 1492 | 1638 | 2654 | 2771 | 3218 | 4268 | 6871 | 8140 |
| नववे बक्षिस रु. 200/- | 0504 | 3847 | 5785 | 5819 | 6681 | 7501 | 8359 | 8988 | 9138 | 9292 |

दहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0019 | 0561 | 1187 | 1744 | 2508 | 3235 | 4091 | 4762 | 5527 | 6109 | 6675 | 7279 | 7811 | 8429 | 8988 | 9528 |
| 0046 | 0573 | 1197 | 1761 | 2531 | 3260 | 4150 | 4832 | 5547 | 6117 | 6681 | 7304 | 7812 | 8455 | 9007 | 9535 |
| 0047 | 0604 | 1201 | 1794 | 2538 | 3275 | 4153 | 4834 | 5554 | 6153 | 6690 | 7310 | 7876 | 8472 | 9026 | 9539 |
| 0062 | 0613 | 1205 | 1817 | 2540 | 3281 | 4165 | 4868 | 5561 | 6156 | 6692 | 7328 | 7889 | 8478 | 9052 | 9540 |
| 0070 | 0638 | 1230 | 1821 | 2612 | 3294 | 4166 | 4876 | 5562 | 6157 | 6707 | 7338 | 7905 | 8480 | 9059 | 9547 |
| 0082 | 0674 | 1239 | 1822 | 2639 | 3299 | 4232 | 4886 | 5594 | 6159 | 6715 | 7342 | 7914 | 8489 | 9086 | 9561 |
| 0093 | 0684 | 1263 | 1837 | 2647 | 3301 | 4241 | 4891 | 5604 | 6160 | 6724 | 7345 | 7924 | 8492 | 9090 | 9563 |
| 0102 | 0697 | 1265 | 1845 | 2650 | 3346 | 4260 | 4923 | 5616 | 6176 | 6725 | 7382 | 7926 | 8496 | 9101 | 9570 |
| 0122 | 0711 | 1291 | 1846 | 2656 | 3371 | 4273 | 4925 | 5647 | 6181 | 6726 | 7390 | 7947 | 8503 | 9105 | 9598 |
| 0132 | 0712 | 1299 | 1857 | 2659 | 3380 | 4279 | 4949 | 5656 | 6194 | 6756 | 7396 | 8009 | 8513 | 9138 | 9603 |
| 0135 | 0720 | 1310 | 1871 | 2672 | 3392 | 4293 | 4975 | 5665 | 6195 | 6764 | 7403 | 8021 | 8522 | 9144 | 9615 |
| 0150 | 0745 | 1331 | 1877 | 2681 | 3398 | 4294 | 4976 | 5691 | 6200 | 6772 | 7404 | 8024 | 8534 | 9158 | 9624 |
| 0155 | 0747 | 1339 | 1886 | 2692 | 3403 | 4298 | 4978 | 5714 | 6214 | 6774 | 7438 | 8029 | 8536 | 9160 | 9625 |
| 0165 | 0749 | 1349 | 1896 | 2711 | 3413 | 4299 | 4986 | 5720 | 6219 | 6792 | 7463 | 8031 | 8553 | 9170 | 9628 |
| 0181 | 0750 | 1351 | 1897 | 2732 | 3415 | 4306 | 4995 | 5734 | 6225 | 6806 | 7468 | 8035 | 8572 | 9174 | 9648 |
| 0191 | 0767 | 1370 | 1933 | 2751 | 3423 | 4321 | 5001 | 5781 | 6230 | 6814 | 7478 | 8051 | 8585 | 9177 | 9715 |
| 0192 | 0804 | 1373 | 1947 | 2766 | 3451 | 4324 | 5011 | 5796 | 6253 | 6816 | 7489 | 8060 | 8610 | 9191 | 9727 |
| 0193 | 0806 | 1380 | 1993 | 2779 | 3482 | 4329 | 5035 | 5799 | 6264 | 6850 | 7507 | 8063 | 8625 | 9194 | 9729 |
| 0215 | 0819 | 1383 | 1998 | 2788 | 3484 | 4332 | 5074 | 5804 | 6273 | 6877 | 7510 | 8079 | 8629 | 9195 | 9730 |
| 0217 | 0824 | 1394 | 2040 | 2797 | 3514 | 4333 | 5079 | 5816 | 6311 | 6887 | 7521 | 8095 | 8636 | 9216 | 9764 |
| 0221 | 0848 | 1415 | 2055 | 2816 | 3601 | 4336 | 5096 | 5835 | 6317 | 6888 | 7522 | 8103 | 8639 | 9219 | 9773 |
| 0222 | 0854 | 1424 | 2066 | 2833 | 3603 | 4378 | 5100 | 5851 | 6326 | 6892 | 7523 | 8106 | 8654 | 9235 | 9788 |
| 0224 | 0868 | 1449 | 2071 | 2836 | 3614 | 4390 | 5102 | 5853 | 6328 | 6900 | 7539 | 8111 | 8660 | 9244 | 9795 |
| 0233 | 0874 | 1451 | 2104 | 2841 | 3664 | 4391 | 5140 | 5855 | 6330 | 6915 | 7544 | 8116 | 8687 | 9251 | 9797 |
| 0238 | 0876 | 1459 | 2109 | 2848 | 3674 | 4432 | 5190 | 5866 | 6331 | 6921 | 7548 | 8156 | 8697 | 9252 | 9806 |
| 0262 | 0880 | 1478 | 2112 | 2849 | 3692 | 4440 | 5196 | 5867 | 6343 | 6952 | 7554 | 8157 | 8703 | 9287 | 9808 |
| 0266 | 0882 | 1479 | 2125 | 2879 | 3694 | 4475 | 5197 | 5872 | 6354 | 6963 | 7557 | 8169 | 8706 | 9288 | 9824 |
| 0276 | 0892 | 1482 | 2129 | 2886 | 3710 | 4477 | 5198 | 5882 | 6357 | 6976 | 7561 | 8171 | 8707 | 9295 | 9828 |
| 0316 | 0896 | 1497 | 2145 | 2911 | 3720 | 4488 | 5233 | 5887 | 6361 | 7027 | 7581 | 8172 | 8739 | 9300 | 9832 |
| 0323 | 0903 | 1520 | 2147 | 2954 | 3731 | 4498 | 5246 | 5897 | 6395 | 7044 | 7612 | 8180 | 8752 | 9313 | 9834 |
| 0331 | 0919 | 1530 | 2162 | 2989 | 3740 | 4499 | 5259 | 5907 | 6421 | 7051 | 7614 | 8183 | 8768 | 9315 | 9840 |
| 0377 | 0926 | 1531 | 2187 | 3001 | 3748 | 4502 | 5261 | 5917 | 6422 | 7065 | 7644 | 8184 | 8772 | 9346 | 9843 |
| 0380 | 0936 | 1542 | 2216 | 3004 | 3751 | 4507 | 5278 | 5924 | 6431 | 7094 | 7661 | 8190 | 8773 | 9350 | 9844 |
| 0383 | 0940 | 1555 | 2220 | 3011 | 3752 | 4511 | 5294 | 5928 | 6458 | 7098 | 7665 | 8194 | 8777 | 9352 | 9855 |
| 0385 | 0941 | 1572 | 2222 | 3023 | 3753 | 4513 | 5297 | 5930 | 6461 | 7100 | 7666 | 8205 | 8781 | 9390 | 9869 |
| 0389 | 0975 | 1581 | 2235 | 3030 | 3755 | 4545 | 5344 | 5944 | 6471 | 7107 | 7668 | 8216 | 8785 | 9399 | 9886 |
| 0402 | 0981 | 1598 | 2249 | 3060 | 3765 | 4552 | 5372 | 5945 | 6473 | 7108 | 7695 | 8281 | 8807 | 9402 | 9889 |
| 0415 | 0999 | 1614 | 2277 | 3071 | 3791 | 4591 | 5383 | 5951 | 6516 | 7110 | 7697 | 8299 | 8811 | 9405 | 9914 |
| 0429 | 1030 | 1623 | 2290 | 3076 | 3856 | 4623 | 5407 | 5954 | 6519 | 7123 | 7701 | 8311 | 8817 | 9417 | 9916 |
| 0455 | 1031 | 1627 | 2295 | 3078 | 3865 | 4625 | 5418 | 5967 | 6523 | 7151 | 7709 | 8312 | 8828 | 9432 | 9919 |
| 0463 | 1041 | 1664 | 2329 | 3089 | 3897 | 4655 | 5421 | 6005 | 6528 | 7184 | 7719 | 8319 | 8837 | 9446 | 9924 |
| 0473 | 1060 | 1665 | 2332 | 3092 | 3917 | 4662 | 5430 | 6020 | 6529 | 7185 | 7724 | 8320 | 8850 | 9457 | 9928 |
| 0478 | 1062 | 1674 | 2374 | 3128 | 3975 | 4669 | 5431 | 6031 | 6534 | 7197 | 7739 | 8326 | 8881 | 9468 | 9929 |
| 0488 | 1063 | 1680 | 2375 | 3138 | 3985 | 4688 | 5442 | 6032 | 6556 | 7199 | 7749 | 8337 | 8913 | 9477 | 9931 |
| 0493 | 1080 | 1707 | 2376 | 3155 | 3988 | 4696 | 5446 | 6035 | 6567 | 7206 | 7752 | 8343 | 8914 | 9481 | 9943 |
| 0504 | 1095 | 1711 | 2456 | 3170 | 4034 | 4716 | 5450 | 6036 | 6578 | 7212 | 7757 | 8347 | 8917 | 9482 | 9958 |
| 0512 | 1127 | 1716 | 2476 | 3179 | 4066 | 4725 | 5473 | 6059 | 6611 | 7217 | 7758 | 8361 | 8919 | 9490 | 9966 |
| 0534 | 1135 | 1720 | 2492 | 3188 | 4074 | 4743 | 5490 | 6061 | 6618 | 7231 | 7763 | 8401 | 8931 | 9515 | 9987 |
| 0550 | 1137 | 1724 | 2496 | 3218 | 4076 | 4754 | 5512 | 6089 | 6623 | 7246 | 7778 | 8408 | 8943 | 9518 | 9996 |
| 0557 | 1167 | 1725 | 2503 | 3229 | 4077 | 4756 | 5518 | 6093 | 6632 | 7263 | 7788 | 8417 | 8984 | 9526 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# आज हरितालिका! पूजेची योग्य वेळ, व्रत आणि विधी



■ मुंबई

**भाद्रपद** तृतीयेला हरितालिकाचे पूजन करण्याची परंपरा आहे. कुमारिका आणि महिला हे व्रत करतात. भगवान शंकर आणि पार्वतीची पूजा-अर्चा केली जाते. पतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत करतात. या दिवशी महिला दिवसभर काहीच खात नाहीत. त्यामुळे हा उपवास सगळ्यात कडक मानला जातो. उद्या गुरुवारी ९ सप्टेंबर २०२१ ला हरितालिका आहे. तिच्या पूजेचा योग्य मुहूर्त पहाटे ६ वाजून ३ मिनिटांपासून सकाळी ८ वाजून ३३ मिनिटांपर्यंत आहे.

प्रदोष काल हरितालिका व्रत पूजा मुहूर्त सायंकाळी ६ वाजून ३३ मिनिटांपासून रात्री ८.५१ वाजेपर्यंत आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी शिव-पार्वतीच्या मातीच्या मूर्तीचे विसर्जन करून महिला हे व्रत पूर्ण करतील. भाद्रपद चतुर्थीला श्रीगणेशाची पार्थिव पूजा केली जाते. त्यापूर्वी तृतीयेला हरितालिकेचे पूजन केले जाते. यावर्षी उद्या ९ सप्टेंबरला हे व्रत आहे. देशाच्या अनेक राज्यांत हे व्रत साजरे केले जाते. या दिवशी महिला सकाळी लवकर उठून स्नान करतात. नवे वस्त्र परिधान करतात. पूजेसाठी चौपाटावर केळ्यांच्या पानांचा मंडप करून त्यात वाळूचे शिवपिंड करतात किंवा शिवपार्वतीची प्रतिमा ठेवतात. रात्रभर जागरण करून खेळ खेळतात, गाणी म्हणतात, भजन-कीर्तन करतात आणि आरती करतात. भगवान शंकरासाठी देवी पार्वतीने हे व्रत केले होते, अशी आख्यायिका आहे. हरितालिका एक पौराणिक कथा आहे. यानुसार पार्वतीच्या मैत्रिणी तिचे अपहरण करून तिला जंगलात घेऊन गेल्या होत्या. पार्वतीच्या इच्छेविरुद्ध भगवान विष्णूने तिच्याशी विवाह करू नये म्हणून तिच्या मैत्रिणी तिला जंगलात घेऊन जातात. तिथे देवी पार्वतीने भगवान शंकराची आराधना केली. तिच्या तपस्येने शंकर प्रसन्न होतात आणि तिचा पत्नी म्हणून स्वीकार करतात, अशी ही आख्यायिका आहे.

# लग्नाला न आलेल्या पाहुण्यांना १७ हजारांचा दंड!



**आपल्या लग्नाचा दिवस येणाऱ्या पाहुण्यांच्याही कायम लक्षात राहणारा असावा असे प्रत्येकाचे स्वप्न असते. शिकागोमधील एका तरुणीने आपल्या लग्नाचा दिवस पाहुण्यांच्या, खासकरून लग्नाला न आलेल्या पाहुण्यांच्या अगदी कायम लक्षात राहील असे काहीतरी केले आहे. या नवरीने ऐनवेळी प्लॅन कॅन्सल करणाऱ्या पाहुण्यांना चांगलाच दणका दिला आहे. त्यांच्या न येण्याने जे अन्न वाया गेले, तयारीचा जो अधिकचा खर्च लागला त्याचे बिलच चक्क तिने या पाहुण्यांना मेल केले आहे. त्यांच्या न येण्याने तिचे जे नुकसान झाले त्याची भरपाई म्हणून भडकलेल्या नवरीने चक्क १७ हजार रुपयांचे बिल पाठवले आहे. आपल्या लग्नात हजर न राहणाऱ्या नातेवाईकांवर चिडलेल्या नवरीने पाठवलेल्या या बिलाचा फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतो आहे.**

आजकाल तरुणाईमध्ये ‘डेस्टिनेशन वेडिंग’ची क्रेझ आहे. शिकागोमध्ये राहणाऱ्या या जोडप्यानेदेखील डेस्टिनेशन वेडिंग करण्याचे ठरवले. आपण ज्या शहरात राहतो त्यापासून लांब, दुसऱ्या शहरात किंवा राज्यात किंवा एखाद्या रमणीय ठिकाणी केलेला विवाहसोहळा म्हणजे डेस्टिनेशन वेडिंग. आपल्या राहत्या घरापासून लग्नाचे ठिकाण लांब असल्याने पाहुण्यांच्या राहण्याची सोयही यामध्ये त्या जोडप्याला करावी लागते. त्यामुळे साहजिकच खर्चही वाढतो. इंटरनेटवर बराच रिसर्च केल्यानंतर या जोडप्याने वेस्ट इंडिजमध्ये असणाऱ्या जमैकामधील एक रिसॉर्ट लग्नासाठी घेण्याचे ठरवले.

लग्नासाठी-रिसेप्शनसाठी किती पाहुणे येऊ शकतील याचा अंदाज येण्यासाठी त्यांनी आपल्या सर्व पाहुण्यांना पत्र लिहून लग्नाला येणार असल्यास ‘कन्फर्म’ करण्यास सांगितले. पत्राला सकारात्मक होकार कळवणाऱ्या पाहुण्यांचा एकूण आकडा लक्षात आल्यावर त्यांनी जमैकामधील या रिसॉर्टमध्ये त्यानुसार रूम्स बुक केल्या आणि जेवणाच्या ताटांची ऑर्डर दिली. परंतु ऐन लग्नाच्या दिवशी यापैकी अनेक पाहुणे आलेच नाहीत. रिकाम्या राहिलेल्या रूम्सचे किंवा जेवणाच्या ताटांचे पैसे परत करण्याची सोय या रिसॉर्टच्या पॉलिसीमध्ये नव्हती. त्यामुळे होकार कळवून न आलेल्या पाहुण्यांचे रूमचे भाडे आणि जेवणाच्या ताटाचे पैसे वाया गेले होते. याच कारणामुळे चिडलेल्या वधुने शेवटी या न आलेल्या नातेवाईकांना १७ हजारांचे बिल पाठवले. त्यासोबत तिने हे बिल कशाचे आहे ते देखील लिहिले. ’ तुम्ही लग्नाला आणि रिसेप्शनला यायला होकार देऊनही ऐन सोहळ्याच्या दिवशी अनुपस्थित राहिल्यामुळे तुम्हाला हे इनव्हॉइस पाठवण्यात येत आहे. तुम्ही लग्नाला येण्याची खात्री दिल्यामुळे आम्ही तुमच्या जेवणाच्या ताटाची आणि रूमची आगाऊ रक्कम भरली होती. तुम्ही येणार नसल्याचे कळवण्यासाठी एकही फोन किंवा मेसेज आम्हाला केला नाही त्यामुळे तुमचे बुकिंग आम्ही कॅन्सल केले नाही. परंतु तुम्ही होकार कळवूनही न आल्याने आमचे आर्थिक नुकसान झाले आहे आणि त्याची भरपाई म्हणून तुम्ही तुमची रक्कम भरावी. ही रक्कम तुम्ही ऑनलाइन पेमेंटने आमच्या खात्यात जमा करू शकता. कृपया आमच्याशी संपर्क साधा आणि तुमच्यासाठी कोणती पेमेंट पद्धत योग्य आहे ते आम्हाला कळवा. धन्यवाद!’ असे त्या मेलमध्ये लिहिले होते.

या बिलाचा फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आणि नेटकऱ्यांमध्येही यावरून दोन गट पडले. या सगळ्याला पाठिंबा देणाऱ्या अनेक जोडप्यांनी त्यांना त्यांच्या लग्नात आलेले असेच अनुभव लिहिले. आमच्या लग्नातही पाहुणे होकार कळवून आले नाहीत त्यामुळे आमचेही पैसे असेच वाया गेले होते. ’आपण येणार नसू तर ते कळवण्याची तसदी न घेणाऱ्या लोकांसाठी हेच योग्य आहे.’, ’भविष्यात आम्ही हे लक्षात ठेवू, आणि आमच्या पाहुण्यांना याची पूर्वकल्पना देऊ’ असे अनेकांनी म्हणत नवरीच्या धाडसाचे कौतुक केले. परंतु दुसरीकडे अनेक नेटकऱ्यांनी या जोडप्याला नावे ठेवण्यास सुरुवात केली. ’लग्नाचे आमंत्रण स्वीकारणे म्हणजे एकमेकांशी कायदेशीर करार करणे नाही. कोरोनाच्या काळात ऐनवेळी प्लॅन कॅन्सल होऊ शकतात’, ’आपल्या पाहुण्यांना असे बिल पाठवून पैसे भरायला लावणे त्यांचा अपमान करण्यासारखे आहे.’ अशी टीकाही अनेकांनी केली आहे.

# माजी आमदाराच्या मुलासह नातवाचा नाल्याच्या पुरात वाहून मृत्यू

**नांदेड-** मुसळधार पावसामुळे नांदेड जिल्ह्यातील मुखेड उस्माननगर रस्त्यावरील मोती नाल्याला पूर आला होता. या नाल्याच्या पुराच्या पाण्यात कारसह वाहून गेलेले पितापुत्रांचा मृतदेह सापडला असून हे पितापुत्र माजी आमदार किशन राठोड यांचे मुलगा आणि नातू आहेत. भगवान राठोड (६५) आणि संदिप राठोड (३८) अशी मृत व्यक्तीची नावे आहेत.

मुखेड तालुक्यातील कमळेवाडी येथून राठोड पितापुत्र कार चालक उद्धव देवकतेला घेऊन कारने कमळेवाडी येथून पांडुर्णी मार्गे मुखेडकडे येत होते. काल सकाळी कार मुखेडनजीक असलेल्या मोती नाल्याजवळ आली असता संदिप राठोडला पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने कार पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. बचाव पथकाला कार सापडली होती. मात्र रात्र झाल्याने बचाव कार्य थांबण्यात आले होते. त्यानंतर हे कार्य पुन्हा सकाळी सुरू करण्यात आले. पितापुत्र २४ तास उलटूनही सापडले नव्हते. मात्र आज नाल्यापासून ५०० मिटर अंतरावर दोन्ही मृतदेह सापडले आहेत.

# गोरेगावमधील म्हाडा वसाहतींचा विशेष बाब म्हणून पुनर्विकास होणार

**राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय**

■ मुंबई

**मुंबईतील** गोरेगाव येथील मोतीलाल नगर येथील म्हाडा वसाहतींचा विशेष बाब म्हणून पुनर्विकास करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. म्हाडाच्या गोरेगाव (प.) येथील मोतीलाल नगर १, २ व ३ येथे सुमारे ५० हेक्टर ऐवढ्या जागेवर गाळ्यांची अंदाजित संख्या ३७०० व झोपड्यांची संख्या अंदाजे १६०० अशी एकत्रित ५३०० इतकी आहे. मोतीलाल नगर वसलेल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ लक्षात घेता, गाळ्यांची घनता १०६ गाळे प्रति हेक्टर आहे. ही घनता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३० (बी) नुसार ४५० गाळे प्रति हेक्टरपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे प्रत्यक्षात तेथे पुनर्विकासास मुबलक जागा उपलब्ध आहे. शिवाय, सध्या तेथे अस्तित्वात असलेल्या रहिवाशांना त्यांनी धारण केलेल्या गाळ्यांच्या क्षेत्रफळापेक्षा मुबलक मोकळी जागा वापरण्यास उपलब्ध आहे. मोतीलाल नगर वसाहतीचा पुनर्विकास केल्यावर पुनर्वसन घटकाव्यतिरिक्त साधारणपणे ३३,००० गाळे सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे यास विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. या वसाहतीचे एकूण क्षेत्र सुमारे ५० हेक्टर क्षेत्रफळ, त्यावरील गाळ्यांची १०६ प्रती हेक्टर घनता, पुनर्विकास घटकासाठी लागणारे क्षेत्रफळ, या पुनर्विकासासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली २०३४ च्या विनियम ३३ (५) मधील अनुज्ञेयतेपेक्षा निवासी - अनिवासी वापराकरीता अधिकचे बांधकाम क्षेत्रफळ मंजूर करावयाचे असल्याने, तसेच हा पुनर्विकास प्रकल्प कंन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट एजन्सी ची नेमणूक करून करावयाचा असल्याने या प्रकल्पास विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्याचा निर्णय झाला. या प्रकल्पांतर्गत निवासी वापराकरीता प्रतीगाळा १६०० चौ.फु. बांधकाम क्षेत्रफळ मंजूर करण्यात येईल. मात्र, या १६०० चौ.फु. बांधकाम क्षेत्रफळापैकी विनियम ३३(५) च्या तरतुदींनुसार अनुज्ञेय असलेल्या ८३३.८० चौ.फु. बांधकाम क्षेत्रफळापेक्षा अधिकच्या क्षेत्रफळासाठी येणारा बांधकाम खर्च या पुनर्विकास प्रकल्पासाठीच्या एजन्सीला करावा लागेल.

**राज्यात विविध ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प उभारणार**

महानिर्मिती कंपनीच्या राज्यातील विविध जागांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आज राज्यमंत्रिमंडळाने मंजुरी दिली. तसेच महानिर्मितीकडून भागभांडवल उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली. १८७ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांसाठी तसेच ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी २ स्वतंत्र प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली.

# मुलींना एनडीएत प्रवेश देणार

**नवी दिल्ली-** राष्ट्रीय संरक्षण अकादमीत (एनडीए) महिलांना भरती होण्यास परवानगी दिली आहे अशी माहिती आज केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात दिली. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी न्या. संजय कौल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर ही माहिती दिली. एनडीएच्या परीक्षेत महिलांनाही संधी मिळावी या मागणीसाठी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. यावेळी केंद्राने आपली भूमिका खंडपीठासमोर स्पष्ट केली. सरकारी वकिल भाटी यांनी खंडपीठाला सांगितले की, ही चांगली बातमी आहे की, एनडीएच्या माध्यमातून आता महिला देखील सशस्त्र दलांमध्ये जाऊ शकतील. सैन्य दल आणि सरकारने वरिष्ठ पातळीवर हा चांगला निर्णय घेतला आहे. काल संध्याकाळी हा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही यावेळी भाटी यांनी दिली. यानंतर खंडपीठाने सरकारी वकिलांच्या एका प्रतिज्ञापत्राद्वारे हा जबाब रेकॉर्डवर घेण्यास सांगितले.

# जम्बो लसींचे श्रेय घेण्यासाठी बविआ-भाजपात चढाओढ

**वसई-** एक लाख लसींचे श्रेय घेण्यासाठी स्थानिक सत्ताधारी आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांमध्ये चढाओढ लागली असून त्यात काँग्रेसने टपली मारल्यामुळे वसई तालुक्यात राजकिय रंगत निर्माण झाली आहे. लसीकरणासाठी धडपडणाऱ्या वसई तालुक्याला १ लाख लसींचा कोटा पाठवण्यात आल्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या उत्साहातच त्याचे श्रेय घेण्यासाठी स्थानिक सत्ताधारी बहुजन विकास आघाडी आणि केंद्रातील सत्ताधारी भाजपा पदाधिकाऱ्यांमध्ये चढाओढ सुरु झाली आहे. बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकुर सातत्याने लसीसाठी सातत्याने प्रयत्न करीत होते. आमदार क्षितीज ठाकुर आणि माजी महापौर प्रवीण शेट्टी हे राज्य सरकारकडे आणि आमदार राजेश पाटील, माजी महापौर नारायण मानकर, माजी खासदार बळीराम जाधव हे दिल्लीला पाठपुरावा करीत होते. त्या प्रयत्नाला यश आल्यामुळे एक लाख डोस वसईला मिळाल्याचे बहुजन विकास आघाडीने जाहीर केले आहे. तर ही लस प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे उपलब्ध झाल्याचे भाजपाचे म्हणणे आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री भारती पवार यांच्याशी बोलणे झाले होते आणि झोपी गेलेल्या महाराष्ट्र शासनाला जाग आली. वसई-विरारचे लसीकरण फक्त २१ टक्के झाले होते. बाकी ठिकाणी ५० टक्क्यांहून अधिक झाली म्हणून ती पाठवली, असे भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजन नाईक यांनी सांगितले. तर आमच्या प्रयत्नामुळे लस मिळाल्याने निद्रीस्त आत्मे जागे झाले असून, त्यांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याचा टोला माजी महापौर प्रवीण शेट्टी यांनी लगावला आहे. या दोघांच्या श्रेय घेण्यासाठी चाललेल्या धडपडीचा काँग्रेसने निषेध केला आहे. या दोन्ही पक्षाने पैसे घेवून लसी टोचल्या आहेत. त्यावेळी लसी उपलब्ध होत होत्या. मग मोफत लसींना का उशीर झाला? त्याबाबत श्रेय न घेता आधी त्यांनी जनतेची माफी मागावी असे आवाहन नालासोपारा ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष कुमार काकडे यांनी करून श्रेय लाटणाऱ्यांची हवा काढून टाकली आहे.


**जाहीर सूचना**

गोवा सरकारद्वारा प्रस्तुत

**गोल्डन श्री गणेश मंथली लॉटरी**

गोल्डन लॉटरीच्या सर्व ग्राहकांना सूचित केले जात आहे की गोवा सरकारने जारी केलेले गोल्डन श्री गणेश मासिक लॉटरी तिकीट (किंमत रु. 100, तारीख 14/09/2021, सोडतीची वेळ संध्या. 5 वा.) सुरुवातीला घोड्याच्या छायाचित्रासह काढण्यात आले होते. तिकीट छपाईमध्ये झालेल्या चुकीमुळे घोड्याच्या फोटोसह प्रिंट झालेल्या तिकिटांची विक्री रद्द करण्यात आली आहे आणि हे तिकीट बाजारातून परत घेतले आहे. आता नवीन फुलांच्या डिझाईनमधील फोटोसह तिकीटे काढण्यात आली आहेत. कृपया फक्त फुलांचा फोटो छापलेली तिकिटे खरेदी करा. कोणत्याही ग्राहकाने किरकोळ विक्रेत्याकडून घोड्याचे चित्र असलेले तिकीट खरेदी केले असेल, तो ग्राहक त्याच किरकोळ विक्रेत्याला तिकीट परत करून नवीन तिकीट किंवा पैसे परत मिळवू शकतो. घोड्याचे फोटो असलेल्या छापील जुन्या तिकिटांवर कोणतेही बक्षीस सरकारकडून दिले जाणार नाही. तिकिटाच्या डिझाइनशिवाय गोल्डन श्रीगणेश लॉटरीमध्ये कोणताही बदल (लॉटरी योजना, तिकीट किंमत, ड्रॉ तारीख आणि वेळ इ.) नाही.

रद्द केलेले तिकीट | नवीन जारी केलेले तिकीट




अधिक माहितीसाठी अधिकृत मार्केटींग एजंटकडे संपर्क करा 9821601414 प्रस्तुतकर्ता : लघुवचत आणि लॉटरीज् संचालनालय (गोवा)


# बेळगाव महाराष्ट्राचेच आहे की नाही हे भाजपाने स्पष्ट करावे

■ मुंबई

**दोन** दिवसापूर्वी बेळगाव महापालिका निवडणुकीचा निकाल लागला. यामध्ये भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले तर शिवसेनेचा पाठिंबा असलेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीला अवघ्या चार जागांवर समाधान मानावे लागले. बेळगावामध्ये मराठी माणसाचा पराभव झालेला नाही. तर बेळगावात शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या अहंकाराचा पराभव झालेला आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. फडणवीस यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना संजय राऊत यांनी भाजपाने फालतू गप्पा मारु नये, बेळगाव महाराष्ट्राचेच आहे की नाही ते स्पष्ट करावे असे म्हटले आहे. खा. संजय राऊत यांनी ट्विट करत म्हटले आहे की, महाराष्ट्र भाजपाने फालतू गप्पा मारु नयेत. बेळगाव महाराष्ट्राचेच आहे की नाही एवढेच त्यांनी आज स्पष्ट करावे. तो कुणाचा काय अहंकार हे नंतर बघू. मराठी एकजुटीचा बेळगावात विजय झालाच पाहिजे असे बोलणे अहंकार की मराठी अस्मिता हे ११ कोटी मराठी जनतेलाच ठरवू द्या, असे म्हटले आहे. तर दुसऱ्या ट्विटमध्ये त्यांनी म्हटले आहे की, बेळगावात एकीकरण समितीचा पराभव घडवून आणला. भाजपाचे महाराष्ट्रातील पुढारी म्हणतात आमचा भगवा बेळगाववर फडकला. मग एककरा पालिकेच्या पहिल्या सभेत बेळगाव महाराष्ट्रात विलीन करण्याचा ठराव मंजूर करा. तसेच बेळगावातील विजयी मराठी उमेदवारांना मुंबईतील हुतात्मा स्मारकासमोर डोके टेकून महाराष्ट्र अस्मितेची शपथ घ्यायला लावा, असे आव्हानच राऊत यांनी दिले आहे.

**संजय राऊत यांचा फडणवीसांवर पलटवार**

# अंधेरीत फेरीवाल्यांविरोधात मनसेचा मोर्चा

**आयुक्तांना दिला अल्टीमेटम**

■ मुंबई

**ठाण्याच्या** कासारवडवली येथे एका फेरीवाल्याने ठाणे पालिका सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे याच्यावर हल्ला केला होता. उशीरा का होईना मनसेने अंधेरी (पश्चिम) येथील पदपथांवरील परप्रांतीय फेरीवाल्यांविरोधात आक्रमक भूमिका घेत अंधेरी पालिका कार्यालयावर आज मोर्चा काढला. होशमे आओ फेरीवालो के विरोध मे मनसे मैदान मे, मुजोर फेरीवाले हटवा, पदपथ वाचवा, अशी घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी मनसे विभाग अध्यक्ष मनीष धुरी, उपविभाग अध्यक्ष किशोर राणे, कुशल धुरी, शोभना पाटील यांच्या नेतृत्वाखाली पालिका कार्यालयावर धडक दिली. यावेळी प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यानंतर मनसेच्या शिष्टमंडळाने पालिका सहाय्यक आयुक्त चौशन यांची भेट घेऊन दोन दिवसात फेरीवाले हटवून पदपथ मोकळे करा. कारवाईच्यावेळी तुमच्या अधिकाऱ्यांना आम्ही संरक्षण देऊ. पालिकेने कारवाई न केल्यास मनसे रस्त्यावर उतरेल, असा अल्टीमेटम मनसेच्या शिष्टमंडळाने सहाय्यक आयुक्तांना यावेळी दिला.

# अखिल मंडई मंडळाच्या शारदा गजाननाची प्राणप्रतिष्ठापना दुपारी बारा वाजता होणार! यंदाचे १२८ वे वर्ष

■ पुणे

**अखिल** मंडई मंडळाचा १२८ वा गणेशोत्सव मागील वर्षाप्रमाणे यंदाही साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. मंदिरातच शारदा गजानन विराजमान होणार आहेत. गणेश चतुर्थीला शुक्रवार, दिनांक १० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता श्रींची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे आणि मीना भोंडवे यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. अविनाश कुलकर्णी गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न होईल, अशी माहिती अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली.

ऑनलाईन पद्धतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी ६ वाजल्यापासून प्रात:पूजा, आरती, गणेशयाग,सायंपूजा आणि संध्याकाळी ०७.३० वाजता महाआरती होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून शारदा गजाननाचे दर्शन घेण्यासाठी गणेशभक्त येतात. त्यामुळे उत्सवकाळात २४ तास ऑनलाईन दर्शनाची सोय करण्यात आली आहे. मंडळाच्या https://akhilmandaimandal.org/ या वेबसाईट वरुन शारदा गजाननाचे दर्शन घेता येणार आहे. तरी भाविकांनी ऑनलाईन दर्शनाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. अण्णा थोरात म्हणाले, दरवर्षी उत्साहात आणि सर्व जाती धर्मातील आणि मंडईतील कष्टकरी लोकांना सामावून घेऊन अखिल मंडई मंडळाचा गणेशोत्सव साजरा होत असतो. १२८ वर्षांच्या इतिहासात दुसऱ्यांदा मंदिरातच गणेशोत्सव साजरा होणार आहे.




संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# कोरोनानंतरची उद्योग रोजगारातली वाढ

कोरोनाच्या काळात म्हणजेच गेल्या वर्ष दीड वर्षापासून देशाचे अर्थचित्र रुतले असल्याचे वर्णन वारंवार केले गेले. आता अनेक महिन्यांचा लॉकडाऊन अनेक उद्योग व्यवसाय बंद पडण्याचे प्रकार, कामगारांचे स्थलांतर, कामच नसल्याने कामगारांची कपात अशा अनेक गोष्टी गेल्या वर्षदीड वर्षात घडून आल्या. बेरोजगारी तर निर्माण झालीच. परंतु नव्याने नोकऱ्या मिळण्याची शक्यताही मंदावली होती. या सगळ्या परिस्थितीतून बाहेर येण्याकरीता पुन्हा पुढचा वर्ष दीडवर्षाचा कालावधी लागेल असेदेखील वारंवार सांगितले गेले. एवढेच नाही तर बेरोजगारीत आणखी वाढ होईल आर्थिक विकासाचा दर खाली येईल. म्हणजेच पुढचा बराच मोठा कालावधी हा सगळ्यांचीच कसोटी पाहाणारा असेल असा त्याचा निष्कर्ष काढला गेला होता. अजूनही महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यामध्ये कोरोना पूर्णपणे गेलेला नाही. किंवा कोरोनाशी संबंधित लागू केलेले निर्बंध पूर्णपणे उठवले गेलेले नाहीत. सामान्य लोकांच्या मनातली भीती पूर्णपणे गेलेली नाही. आपापले रोजगार किंवा एकूण जीवनव्यवहार पूर्वपदावर आणण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करतो आहे. एकीकडे हीच स्थिती असताना दुसरीकडे गेल्या सहा महिन्यापासून देशाच्या आर्थिक राजधानीत असलेला शेअरबाजार मात्र रोज नवी उसळी मारतो आहे. एवढेच नव्हे तर नवे उच्चांकदेखील याच काळामध्ये शेअरबाजाराने नोंदवले आहेत. म्हणजे जगभरच सगळ्या परिस्थितीवर परिणाम झाला असताना भारतातला शेअरबाजार चांगल्या स्थितीत राहावा हे नेमके कोणत्या स्थितीचे लक्षण मानावे. एकतर हा मोठाच विरोधाभास ठरतो. अर्थव्यवस्था ठाकठीक नाही. रोजगार नाही. असे सांगितले जात असताना कंपन्यांचे शेअर बाजार वर जावे ही गोष्ट काहीशी अनाकलनीय ठरते. यातला आणखी एक वैशिष्ट्य़पूर्ण भाग म्हणजे गेल्या दीड महिन्यापासून देशभर जे बेरोजगारीचे चित्र निर्माण झाले होते तेही आता बदलू लागले आहे. आतापर्यंत दोन ते अडीच लाख रोजगार नव्याने निर्माण झाले. ही गोष्टसुध्दा काहीशी आश्चर्यकारकच म्हणावी लागते.

### शेअरबाजार सर्वात तेजीत

विशेष म्हणजे शेअरबाजाराच्याबाबतीत कोणतेही ठोस कारण पुढे येत नाही. कारण शेअरबाजार जर वर जात असेल म्हणजेच विविध क्षेत्रामध्ये विविध वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या या कंपन्यांमधले काम आता पूर्ववत होत असावे. त्यांच्या उत्पादनाला किंवा मालाला बाजारपेठही मिळत असावी. आणि त्यांची ही आर्थिक परिस्थिती सुधारत असल्यामुळे त्या कंपन्यांच्या शेअर्सना मागणी येत असावी. जर या कंपन्यांचे कामकाज व्यवस्थित चालत असेल तर मग त्यांना आवश्यक असलेला कर्मचारी वर्गदेखील रुजू झालेला असावा, एवढेच नाही तर त्यांनी नव्याने काही प्रमाणात नोकरभरती केली असल्याची शक्यता आहे. परंतु जवळपास सहा महिन्याचा एकाअर्थी कडकडीत लॉकडाऊन असताना या कंपन्यांनी कुठल्या आधारावर आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी हेसुध्दा मोठे गूढ वाटू लागते. परंतु याचा विचार केल्यानंतर काहीवेळेला असे निदर्शनाला येते की एकतर सरकारकडून थोडेथोडके नव्हे तर तब्बल वीस लाख कोटींचे पॅकेज उद्योगक्षेत्रासाठी दिले गेले. त्यातले सगळेच पॅकेज उद्योगक्षेत्रासाठी नव्हते. पण अगदी पन्नास टक्केजरी मदत गृहित धरली तरी दहा लाख कोटींची मदत उद्योग क्षेत्राला झाली. आणि त्याचादेखील हा परिणाम असू शकतो. तोटा भरून काढत असताना सरकारकडून मिळालेले हे अर्थसाहाय्य त्यांना मदतीचा हात देत असावा. यात आणखी नवीन भर पडली आहे की अलिकडे सरकारने अनेक सरकारी क्षेत्रांचे चलनीकरण म्हणजेच मॉनेटाईझेशन करण्याचा निर्णय घेतला आहे.ज्यामधून सरकार सहा लाख कोटींचे उत्पन्न मिळवणार आहे. खाजगी क्षेत्राला भाडेतत्त्वावर दिले जाणारे उद्योग किंवा प्रकल्प अनेक प्रस्थापित उद्योगांनासुध्दा साहाय्यक ठरेल. कदाचित या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणूनही शेअर बाजार उसळी मारत असावा. काही तज्ज्ञांच्या मते शेअर बाजाराची ही स्थिती तात्पुरत्या स्वरूपाची आहे. ही स्थिती पुढे बराच काळ टिकेल अशी शक्यता नाही. परंतु हा जर तरचा जरी विषय असला तरी आज कोरोनासारख्या महाभयंकर संकटातही उद्योग किंवा शेअर बाजार सुधारत असतील तर त्याची दखल घ्यावी लागेल.

### रेल्वेची मालवाहतुकही वाढली

बंगलोर इथल्या एक्सफेनो या कंपनीने अलिकडेच काही उद्योगांचे व्यवसायांचे सर्व्हेक्षण केले. ऑगस्ट २०२० पासून हळुहळू उद्योगांमधला आत्मविश्वास वाढत असल्याचे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यांच्या आकडेवारीप्रमाणे २०२० च्याच ऑगस्टपर्यंत २.७८ लाख रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या आणि पुढच्या काळातही अडीच लाख रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. कोरोनानंतर परिस्थिती हळुहळू सुधारते आहे. अनेक कंपन्यांच्या ग्राहकांची संख्या गेल्या काही दिवसात आठ ते दहा टक्क्यांनी वाढली आहे. कोरोनाच्या काळात डिजीटलायझेशनमुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकऱ्यांमुळे सतरा टक्के तर इतर नोकरीच्या संधींमुळे आठ ते सोळा टक्के वाढ झाल्याचे या संस्थेने म्हटले आहे. अगदी रेल्वेनेसुध्दा गेल्या आठ दहा महिन्यामध्ये आपल्या मालवाहतुकीमध्ये मोठी वाढ नोंदवली. दोन कोटी साठ लाख टन माल एकट्या पश्चिम रेल्वेने वाहून नेला आहे. अशीच परिस्थिती मध्य, दक्षिण आणि उत्तर रेल्वेचीही आहे. जीवनावश्यक वस्तूंची मालवाहतुक करीत असतानाच आता उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाची वाहतुक मोठ्या प्रमाणावर सुरु झाली आहे. फक्त सध्या सोने चांदी बाजार, बांधकाम क्षेत्र, विमानवाहतुक, रेडीमेड गारमेंट, यासारखे क्षेत्र अपेक्षेप्रमाणे उभारी घेऊ शकलेले नाही. परंतु जर का पुढच्या सहा महिन्यात कोरोनाशी संबंधित सगळे निर्बंध हटवले गेले तर ही परिस्थिती सुधारू शकते. आणि उद्योग व्यवसाय पुन्हा भरारी घेऊ शकतात. कोरोनानंतरची उद्योग आणि रोजगार क्षेत्रातला आत्मविश्वासातली वाढ तूर्तास नोंद घेण्यासारखी आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

एकदा कर्तृत्व सिद्ध झालं की,
संशयाने बघणाऱ्या नजरा,
आपोआप आदरानं झुकतात.

## पंचांग

**गुरुवार ९ सप्टेंबर, २०२१**
**शक १९४३ प्लवनामसंवत्सर**

**भाद्रपद शुक्ल तृतीया * नक्षत्र - हस्त**

**रवी उदय- ०६-२६,**
**रवी अस्त- १८-४५**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कन्या**

हरतालिका, वराह जयंती, सामश्रावणी,
मु.सफर, त्रिलोक जयंती

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**

संपर्क : २३८८०९८१, जाहिरात :८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५, वितरणः २३८२४४६६,
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

## कविता...

### चला सुटी झाली!

चला सुटी झाली, आतां खूप खूप खेळायचे ...ध्रु...
मी मोटारवाला, तुम्ही गांवा चला
मी पैसे घेऊन बसवायचें मी पों पों करित पोचवायचे

मी बनेन इंजीन, शिटी जोरांत फुंकीन
तुम्ही सर्वांनि डबे बनायचे,
तुम्ही ओळींत मागून धांवायचे

मी बनेन चोर, तुम्ही शिपाइस्वार
मी लपुन छपुन निसटायचें
तुम्ही शोधुन मला पकडायचे

मी होईन भट, पोथी सांगेन झट
तुम्ही मला तूप वाढायचें
मी तट्ट असें चालायचें

मी मास्तर होईन, पुस्तक हाती घेईन
मी ऐटीत आंत शिरायचें
तुम्ही एकदम उभें रहायचें

मिळून करू नाटक, सोंगें सजवून झक
मध्यें नाही कुणी हंसायचें
नाही नाही बरे भांडायचे

• वा. गो. मायदेव •



# श्रीलंकेने आफ्रिकेविरुद्धची वनडे मालिका जिंकली



**यजमान श्रीलंकेने पाहुण्या द. आफ्रिकेविरूद्ध झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या वनडे सामन्यात ७८ धावांनी विजय मिळवून मालिका विजयावर देरवील शिक्कामोर्तब केले. तब्बल १९ महिन्यांच्या मोठ्या अवधीनंतर श्रीलंकेने पुन्हा वनडे मालिका जिंकण्याचा पराक्रम केला.**

■ कोलंबो

**या** सामन्यात फिरकी गोलंदाजांचे वर्चस्व राहिले. तब्बल १६ फलंदाज फिरकी गोलंदाजांचे शिकार ठरले. प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने ५० षटकात ९ बाद २०३ धावांची मजल मारली. त्यांच्या असलेंकाचे अर्ध शतक अवघ्या ३ धावांनी हुकले. त्यामुळे मालिकेतील सलग तिसरे अर्ध शतक त्याला काढता आले नाही. त्यांची सुरुवात खराब झाली. सलामीवीर फर्नांडो-चंडीमल ३३ धावातच माघारी परतले. मग त्या धक्क्यातून श्रीलंकेचा संघ फारसा सावरला नाही.

त्यांची ६ बाद १२१ धावा अशी घसरगुंडीदेखील उडाली होती. परंतु तळाच्या फलंदाजांनी केलेल्या चिवट फलंदाजीमुळे त्यांना २०० धावांचा टप्पा गाठता आला. ९व्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या चमिराने ३९ चेंडूत ३ चौकार मारून २९ धावा केल्या. तर करुणारत्ने १६, इशाकाना १० धावा यांचे देखील योगदान महत्त्वाचे ठरले. आफ्रिकेतर्फे महाराजने ३ बळी घेतले. तर लिंड, शम्सीला प्रत्येकी २ बळी मिळाले. माक्रम, मोल्डरने प्रत्येकी एक बळी घेतला.

२०४ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरणाऱ्या आफ्रिकेची सुरुवातीपासूनच घसरगुंडी उडाली. त्यांचा अर्धा संघ ४८ धावातच माघारी परतला. श्रीलंकन फिरकी गोलंदाजांसमोर आफ्रिकन फलंदाजांनी शरणागती पत्करली. त्यांच्या क्लासेनने सर्वाधिक २२ धावा केल्या. तर मलानने १८, एडिलन १७, लिंडने १८ आणि महाराजने १५ धावा केल्या. श्रीलंकेतर्फे पहिलाच सामना खेळणाऱ्या महेशने ३७ धावात ४ बळी घेऊन आफ्रिकेची दाणादाण उडवली. त्याने आपल्या पहिल्याच चेंडूवर सलामीवीर मलनला माघारी पाठवले. महेशला चमिरा आणि असरंगाने प्रत्येकी २ बळी घेऊन चांगली साथ दिली. अष्टपैलू खेळ करणाऱ्या चमिराला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. आफ्रिकेच्या फिरकी गोलंदाजांने तब्बल ४० षटके या सामन्यात गोलंदाजी केली. उभय संघातील टी-२० मालिका शुक्रवारपासून सुरू होते आहे.

- **१९ महिन्यानंतर श्रीलंकेचा वनडे मालिकेत विजय**
- **१६ बळी फिरकी गोलंदाजांना**
- **आफ्रिकन फिरकी गोलंदाजांनी टाकली ४० षटके**
- **महेशचे पदार्पणात ४ बळी**
- **चमिराचा अष्टपैलू खेळ**

# टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा अश्विनला संधी! धवन, चहलला वगळले

■ मुंबई

**युएईत** १७ ऑक्टोबरपासून सुरु होणार्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आज बीसीसीआय सचिव जय शहा यांच्या उपस्थितीत भारतीय संघाची निवड जाहीर करण्यात आली. कर्णधार विराट कोहली याच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच भारतीय संघ टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळणार आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धे साठी भारतीय संघाचे नेतृत्व विराट कोहली (कर्णधार) करणार आहे. तर रोहित शर्मा (उपकर्णधार), केएल राहुल, सुर्यकुमार यादव, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), हार्दीक पांड्या, रविंद्र जडेजा, राहुल चहर, आर. अश्विन, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्थी, जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी यांची निवड करण्यात आली आहे. सुर्यकुमार यादव, राहुल चहर, ईशान किशन, वरुण चक्रवर्ती यांना वर्ल्डकपमध्ये पहिल्यांदाच संधी मिळाली आहे. श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर आणि दीपक चहर हे राखीव खेळाडू असतील, असे बीसीसीआयकडून जाहीर करण्यात आले आहे. तर या स्पर्धेतून भारताचा डावखुरा फलंदाज शिखर धवन आणि अनुभवी गोलंदाज यजुवेंद्र चहल यांना डच्चू देण्यात आला आहे. टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना १४ नोव्हेंबर रोजी रंगणार आहे. तर भारतीय संघाचा सलामीचा मुकाबला २४ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानशी होणार आहे.



# पाक संघातून फखर, सर्फराज 'आऊट'

■ कराची

**आगामी** टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपला संघ जाहीर केला आहे. या संघातून सलामीवीर फखर झमान आणि माजी कर्णधार सर्फराज अहमद यांना वगळण्यात आले. पाकिस्तानचे नेतृत्त्व बाबर आझमकडे देण्यात आले. पाकिस्तानचा संघ - बाबर आझम (कर्णधार), मोहम्मद रिझवान, शादाब खान, आझम खान, हॅरिस रौफ, आसिफ अली, हसन अली, इमाद वासिम, कुशदिल शाह, मोहम्मद हफीझ, मोहम्मद नवाझ, मोहम्मद वासिम, शाहिन आफ्रिदी, सोएब मकसुद, मोहम्मद हस्नैन.

# राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार समितीत अंजली, अंजूम, सरिताचा समावेश

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार निवड समितीत यंदा महाराष्ट्राची माजी आंतरराष्ट्रीय नामवंत नेमबाज अंजली भागवत, माजी भारतीय क्रिकेट संघाची कर्णधार अंजूम चोप्रा, विश्व विजेती बॉक्सर एल. सरिता देवी यांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र सरकारतर्फे दिले जाणारे ध्यानचंद, अर्जुन, द्रोणाचार्य क्रीडा पुरस्कार विजेत्याची ही समिति निवड करेल. भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद, पॅरा ऑलिम्पिकमध्ये ३ पदके जिंकणारा देवेंद्र झझारीया, माजी हॉकीपटू बलदेव सिंग यांचा देखील या निवड समितीत समावेश करण्यात आला आहे.

ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार विजेत्याला २५ लाखांचे, तर अर्जुन पुरस्कार विजेत्याला १५ लाखांचे पारितोषिक मिळणार आहे. ऑलिम्पिक स्पर्धेमुळे यंदाची पुरस्कार विजेत्यांची निवड काहीशी उशीरा होत आहे.

# समिक्षा, सोहम, अथर्व, अस्मि, वेदांत, ओमकारला सुवर्ण

**मुंबई- नवीन** पनवेल येथे लक्ष्मी पब्लिकस्कूल येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या पहिल्या मुंबई विभाग जंप रोप चॅम्पियनशिप स्पर्धेत समिक्षा कायंदेकर, सोहम कांबळे, अथर्व भुरवणे, अस्मि मटकर, वेदांत कायंदेकर, ओमकार बोबडे यांनी सुरेख कामगिरी करताना सुवर्ण पदकाची कमाई केली. तर प्रसाद बोबडेला रौप्य पदक मिळाले. या स्पर्धेत पेण, कर्जत, रायगड, पनवेल, वाशी येथील शंभरपेक्षा जास्त खेळाडूंनी भाग घेतला. रायगड जिल्हा जंग रोप असोसिएशनतर्फे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विजेत्यांना मंदार पनवेलकर, संतोष खंदारे, महेश पाटील यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सर्व पदक विजेते खेळाडू कोल्हापूर येथे २५, २६ सप्टेंबररोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेतील.

**NOTICE**

NOTICE is hereby given that certificate of **CONFIDENCE PETROLEUM LTD.** have been lost or mislaid and application has been made to the Company to issue duplicate in lieu thereof.

| Sr. No. | Shareholder Name | Folio No. | Certificate No. | Distinctive Nos. | No. of Shares |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Sanam B. Jain | 0004264 | 41026 | 6780001-6784000 | 4000 |
| 2. | Harish B. Amin | 0004265 | 41027 | 6784001-6787000 | 3000 |
| 3. | Naresh B. Jain | 0004266 | 41028 | 6787001-6790000 | 3000 |
| 4. | Subtidevi B. Jain | 0004267 | 41029 | 6790001-6793000 | 3000 |
| 5. | Bhawarlal L. Jain | 0004268 | 41030 | 6793001-6797000 | 4000 |

Any person who has a claim in respect of the said shares should lodge such claim with the Company's Registrars & Transfer Agents at **"ADROIT CORPORATE SERVICES PVT. LTD."** 19, Jaferbhoy Industrial Estate 1st Floor, Makhwana Road, Marol Naka, Andheri (E), Mumbai-400 059 within 15 days from the date of publication of this Notice, else the Company will proceed to issue Duplicate Certificates.

Date : 08.09.2021 Place : Mumbai

बृहन्मुंबई महानगरपालिका

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा प्रपत्र क्र. | ७२०००८६५३ दिनांकः ०९.०९.२०२१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | ४ टीपीडी क्षमतेच्या प्लाझ्मा तंत्रज्ञानावर आधारित आठ मॉड्युलर एमएसडब्ल्यू डिस्पोसल युनिट्सचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन व त्यासह एक वर्षाकरिता परिचालन आणि देखभाल |
| निविदा शूल्क | रु. ९४००.०० + (५% जीएसटी) |
| बोली सुरक्षा अनामत/ईएमडी | रु. ४,७१,२००/- |
| निविदा पारित आणि विक्रीचा दिनांक | दि. ०९.०९.२०२१ रोजी ११.०० वाजेपासून |
| निविदा विक्रीचा आणि बोली सुरक्षा अनामत स्वीकारण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | दि. ३०.०९.२०२१ रोजी १६.०० वाजेपर्यंत |
| पाकीट अ, ब आणि पाकीट क चे सादरीकरण (ऑनलाईन) | दि. ३०.०९.२०२१ रोजी १६.०० वाजेपर्यंत |
| बोली पूर्व सभा ठिकाणः उप मु.अभि.(घकव्य) परि., ४ था मजला, खटाव इमारत, ग्रॅण्ट रोड (पश्चिम), मुंबई ४००००७ | दि. १६.०९.२०२१ रोजी ०३.०० वाजता |
| पाकीट अ आणि ब उघडणे | दि. ०४.१०.२०२१ रोजी १६.०० वाजेनंतर |
| पाकीट क उघडणे | दि. ०५.१०.२०२१ रोजी १५.०० वाजेनंतर |
| संपर्काचा पत्ता | कार्यकारी अभियंता परि. (डब्ल्यू.एस) यांचे कार्यालय, सांताक्रुझ बीईएसटी डेपोजवळ, एस. व्ही. रोड, ऑफ मिलन सबवे रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४. ईमेलः trsg2008@yahoo.com |
| बोली उघडण्याचे ठिकाण | कार्य.अभि.परि.(डब्ल्यू.एस.) यांचे कार्यालय |

सदर निविदा प्रपत्र अहस्तांतरणीय आहे.
सदर ई-निविदेकरिता जर कोणतेही जोडपत्र आणि/किंवा शुद्धीपत्रक पारित करण्यात आल्यास, त्याचा तपशील बृमुंमपाची वेबसाईट म्हणजेच http://portal.mcgm.gov.in वर निविदा > ई-निविदा > निविदा अंतर्गत प्रसिद्ध / अपलोड करण्यात येईल. संभाव्य बोलीदारांना याची नोंद घेण्याची विनंती करण्यात येते.
बृमुंमपा कोणतेही कारण न दर्शविता वरील निविदेकरिता प्राप्त झालेला कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा कोणताही किंवा सर्व अर्ज फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.

सही/-
पीआरओ/१०३०/जाही./२०२१-२२ कार्य.अभि.परि.(डब्ल्यू.एस)

खाण्यापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.

# महावितरणच्या भांडूप परिमंडलाची आढावा बैठक

**मुंबई-** महावितरणचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) व कोकण विभागाचे प्रादेशिक संचालक प्रसाद रेशमे यांनी काल भांडूप परिमंडलाची आढावा बैठक घेतली. यावेळी भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता इब्राहिम मुलाणी, भांडूप परिमंडलचे सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) प्रवीण रहांगदळे व परिमंडल तसेच सर्व विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंते उपस्थित होते. मुख्य अभियंता गणेशकर यांनी पुष्पगुच्छ देऊन कोकण प्रादेशिक संचालक प्रसाद रेशमे यांचे स्वागत केले. यावेळी मुख्य अभियंता गणेशकर यांनी विविध उपाययोजना करून बिलिंग प्रणालीमध्ये विविध प्रकारे तपासणी केली. ग्राहक तसेच कायमस्वरूपी वीज जोडणी खंडित केलेल्या ग्राहकांची वेळोवेळी तपासणी करून महावितरणचा महसूल वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सूचना केली.

महावितरणचा महसूल वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश दिले. तसेच, सध्या महावितरणची आर्थिक स्थिती बिकट असून त्यासाठी वसुलीची कारवाई वेगाने करण्याचे निर्देश दिले. थकबाकीदार घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, शेतीपंपाचे थकबाकीदार ग्राहक तसेच स्ट्रीट लाईट तसेच पाणीपुरवठा योजनांची एप्रिल २०२१- सप्टेंबर २०२१ पर्यंतची चालू बिले भरणा करणेसाठी ताबडतोब वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

## इंडियन ओव्हरसीज बँक (महाराष्ट्र) कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

**४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

आपल्या पतसंस्थेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (२०२०-२०२१) झुम ॲपवर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे शुक्रवार दि. २४/०९/२०२१ रोजी सांय. ५.३० वा. आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदांनी लिंकवर लॉगइन करुन संवाद साधावा.

सही/-
राहूल ना. केदार
(सचिव)

## जाहीर सूचना

आमचे अशील म्हणजेच **श्री. सुहैल एस. मंसुरी** यांच्या वतीने **दुकान क्र. ८ आणि ९, रेज हाऊस को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., न्यू कांतवाडी रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०,** खाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेली सर्वप्रथम **श्री. शफी कासम मंसुरी (दिवंगत)** आणि **श्री. सुहैल एस. मंसुरी** यांच्या मालकीच्या मालमत्तेबाबत याद्वारे सूचना देण्यात येत आहे. **श्री. शफी कामस मंसुरी** मृत्यूपत्र न बनविता दि. २१.०८.२०२१ रोजी मरण पावले. त्यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस आणि प्रतिनिधी म्हणून सौ. नसरीन एस. मंसुरी (पत्नी), कु. नझिमा एस. मंसुरी (मुलगी), श्री. सुहैल एस. मंसुरी (मुलगा) आणि श्री. समीर एस. मंसुरी (मुलगा) हे आहेत. सदर **दुकान क्र. ८ आणि ९ फुलरटन इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड** यांच्या नावे भारित आहे.

सदर मालमत्तेच्या बाबतीत विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, मालकी, भाडेकरू, धारणाधिकार, वहिवाट, परवाना किंवा अन्य कोणत्याही मार्गे कोणताही दावा/आक्षेप असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या कालावधीमध्ये लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना कळवावे.

**अनुसूची**

**दुकान क्र. ८ आणि ९, रेज हाऊस को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., न्यू कांतवाडी रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०.**

दिनांक: ९ सप्टेंबर, २०२१

सही/-
लिगलआय व्हेंचर,
ॲडव्होकेट - उच्च न्यायालय
२५५ आणि २५६, २०४, 'व्ही मॉल'
साईधामच्या शेजारी, ठाकूर कॉम्प्लेक्स,
कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१.

## PUBLIC NOTICE

**SHRI. KAMALUDDIN GULAMHUSEIN JIVANI,** a member of the Sagar Classic Co-operative Housing Society Ltd. having address at 62D, Mirza Ghalib Marg (Clare road), Mumbai- 400008 and holding, died on 20/06/2021 without making any nomination.

The society hereby invites claims and objections from the heir or heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 14 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society between 11.30 A.M. to 02.30 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place : Mumbai
Date : 9/9/2021

**For and on behalf of
Sagar Classic Co-operative Housing Society Ltd.
Sd/-
Hon. Secretary**

## सूचना

दि झीशान को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि. पत्ता-सीटीएस क्र. ७३१-ए, हॉल व्हिलेज रोड, कुर्ला पश्चिम, मुंबई - ४०००७० चे सदस्य आणि संस्थेच्या इमारतीमधील सदनिका क्र. बी/२०२ धारण करणारे श्री. **शमिम अख्तर वकील अहमद खान** कोणतेही नामनिर्देशन न करता दि. २६.०४.२०२१ रोजी मरण पावले.

संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार/आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास असलेल्या त्याच्या/ तिच्या/ त्यांच्या दावे/ आक्षेपाच्या समर्थनार्थ अशा कागदपत्रे आणि इतर पुराव्यांसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वरील विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाबाबत संस्थेच्या उप-विधीअन्वये देण्यात आलेल्या पद्धतीने निर्णय घेण्यास मुक्त असेल. दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाकरिता जर कोणतेही दावे/आक्षेप संस्थेस प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने निर्णय घेण्यात येईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधीची प्रत दावेदार/आक्षेपदारांना पाहणीकरिता, संस्थेच्या कार्यालयात/सचिव यांच्याकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीच्या दिनांकापर्यंत स. १०.०० ते दु. २.०० या दरम्यान उपलब्ध असेल.

**दि झीशान को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव**

ठिकाण: मुंबई दिनांक: ०८.०९.२०२१

## जाहीर नोटीस

याद्वारे कळविण्यात येते की, श्रीमती आशा पांडुरंग सावंत, सी-१०, मधुमनिषा सोसायटी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००५५ यांना महाराष्ट्र शासनाकडून कुटुंब निवृत्ती वेतन मिळत होते, त्या दि. १८/०१/२०२१ रोजी मयत झाल्या. मृत्यूपश्चात त्यांना पुढे नमूद केलेप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

**१) श्री. सुधीर पांडुरंग सावंत – ६९ वर्षे – मुलगा**
**२) श्री. श्याम पांडुरंग सावंत – ६३ वर्षे – मुलगा**
**३) श्री. शरद पांडुरंग सावंत – ५९ वर्षे – मुलगा**

उक्त नमूद वारसांना, उक्त नमूद मृत व्यक्तिपश्चात त्याच्या निवृत्त वेतन थकबाकी मिळणेकरिता वारस दाखला हवा असल्याने तसा अर्ज तहसीलदार, अंधेरी यांच्याकडे केला आहे. त्या अनुषंगाने कुणा व्यक्तीचा आक्षेप असल्यास त्यांनी तहसीलदार, अंधेरी यांचे कार्यालय, दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी (प), मुंबई - ४०००५८ यांचेकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्राप्त झालेपासून सात दिवसात संपर्क साधावा. अन्यथा प्रकरणी आक्षेप नाही, असे समजून निर्णय घेण्यात येईल.

## MSEB HOLDING COMPANY LTD

Hongkong Bank Bldg. 4th Floor, M.G. Road, Fort, Mumbai- 400023.
CIN:U40100MH2005153649
Phone No :- 22-22608383 Fax No :- 22619101

**ई–निविदा सुचना**

एमएसईबीएचसीएल/एमएसईडीसीएल (नियोक्ता) च्या वतीने कार्यकारी अभियंता (स्था.), स्थापत्य विभागातील बांद्रा अंतर्गत २०२१–२२ साठी पात्र बोलीदाता/ एजन्सीज कडून सीलबंद निविदा क्र. **EEC/BND/TECH/T-58/2021-22 To EEC/BND/TECH/T-61/2021-22** ला आमंत्रित करत आहेत. निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि एमएसईडीसीएलच्या कामकाजासाठी ई–निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बिड कागदपत्रे ०९.०९.२०२१ ते १५.०९.२०२१ वेळ २३.५५ पर्यंत वेबसाइटवर उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची शेवटची तारीख १६.०९.२०२१ वेळ १४.३० पर्यंत आहे. शक्य असल्यास निविदा त्याच दिवशी १५.०० वाजता उघडली जातील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट **www.mahadiscom.in**, ई–निविदा दुव्यास भेट द्या. एजन्सींना या आणि भविष्यातील ई–निविदा साठी स्वत: ची नोंदणी करण्याची विनंती केली जाते.

पी.आर.ओ.नं–३२४/२०२१

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### पाणी पुरवठा विभाग

**निविदा सूचना क्र.१३/२०२१-२२**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामांकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत (सी.पी.डब्ल्यू.डी. / सार्वजनिक बांधकाम महाराष्ट्र शासन / सिडको / बृहन्मुंबई महानगरपालिका/ रेल्वे/ मजीप्रा ) कंत्राटदाराकडून निविदा मागवीत आहे.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तीची माहिती महाराष्ट्राचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०९/०९/२०२१ ते ०४/१०/२०२१ रोजी , सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि.०४/१०/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत भरता येतील. प्राप्त निविदा दि.०६/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

निविदेबाबतची अधिक माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१ / कराधान-१, दि.१९/०८/२०१७ नुसार निविदा सादर करताना १ जुलै २०१७ नंतर लागू झालेल्या जीएसटी कराच्या बोजाचा विचार करूनच निविदा सादर कराव्यात.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररीत्या सर्व निविदांसाठी बंधनकारक राहील.

जाक्र.कडोंमपा/जसंवि/मुका/४७०
दि. ०८/०९/२०२१

**सही/-
जल अभियंता,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.**

**मास्क वापरा, सामाजिक अंतर ठेवा, हात धुवा! त्री–सुत्रींचे पालन करा!**

## मुंबईत कोरोनाचे ५३० नवे रुग्ण

**मुंबई-** मुंबईत आज कोरोना रुग्णसंख्येने पाचशेचाही टप्पा पार केला आहे. आज मुंबईत ५३० नवे कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. तर आज ३४९ रुग्ण बरे झाले आहेत. त्यामुळे बरे झालेल्यांची एकूण संख्या ७,२५,२४७ झाली आहे. तर आज मुंबईत कोरोनाने ४ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची एकुण संख्या १६००४ वर पोचली आहे.

## चिराग पासवान तेजस्वींच्या भेटीला

**पाटणा-** राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांचे पुत्र तेजप्रताप व तेजस्वी यादव यांच्यातील वादाची चर्चा बिहारमध्ये असताना लोकजनशक्ती पक्षाचे (एलजेपी) खासदार चिराग पासवान आणि तेजस्वी यादव यांच्या भेटीने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'एलजेपी'चे दिवंगत अध्यक्ष रामविलास पासवान यांचे वर्षश्राद्ध रविवारी आहे. त्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी चिराग यांनी आज तेजस्वी यांची भेट घेतली.

## शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित मुंबई

नोंदणी क्र.: बी. ओ. एम./डब्ल्यु.डी./आर. एस. आर./सी. आर./४१५/९१-९२
प्रशासकीय कार्यालय :- ११८, देवी भवन, ५ वा माळा, सेनापती बापट मार्ग, माहिम (प.), मुंबई - ४०० ०१६. फोन नं. ०२२-२४२२२१९६ / २४२२२१९७
**Web: www.shivsahyadripatpedhi.com**

**वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना**

उपरोक्त संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवर सर्व शासकीय नियमांचे पालन करून संस्थेच्या ३० व्या वार्षिक सभेचे आयोजन **शनिवार दिनांक २५ सप्टेंबर, २०२१** रोजी सायंकाळी ०४.०० वाजता "११८, देवी भवन, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड रेल्वे स्टेशन समोर, माहिम (प.), मुंबई - ४०० ०१६" या ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने केले आहे. सभासदांना "**ऑनलाईन**" सभेमध्ये प्रवेश घेता येणार आहे. त्याकरिता सभासदांनी पुढील माहिती संस्थेच्या जवळच्या शाखा कार्यालयात अथवा संस्थेच्या info@shivsahyadripatpedhi.com या ई-मेल आय. डी. वर **दिनांक १८ सप्टेंबर २०२१** पूर्वी द्यावी. जेणेकरून आपणास सभेची ऑनलाईन लिंक पाठवता येईल. (माहिती - सभासदाचे नाव, सभासदाचे क्रमांक, व्हॉट्सअप मोबाईल नंबर, ई-मेल आय. डी.)
टिप : अहवालाची प्रत संस्थेच्या **www.shivsahyadripatpedhi.com** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२१

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार
श्री. प्रताप रघुनाथ वांगडे
महाव्यवस्थापक**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the following Share Certificates for 65 Equity Shares of Rs.10/- (Rupees ten only) each with Folio No. **030675088** of **Reliance Industries Limited**, having its registered office at Maker Chambers IV, 3rd Floor, 222 Nariman Point, Mumbai, Maharashtra- 400021 registered in the name of **KAMLABEN D JAIN** have been lost. **KAMLABEN DANMALJI JAIN** has applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio | Certificate No. | Dist. From | Dist. To | No. of Shares |
|---|---|---|---|---|
| 030675088 | 12599578 | 256640360 | 256640369 | 10 |
| | 16805332 | 469946985 | 469947009 | 25 |
| | 16805333 | 469947010 | 469947034 | 25 |
| | 16805334 | 469947035 | 469947039 | 5 |

Place : Mumbai
Date : 9/9/2021

Sd/-
**KAMLABEN DANMALJI JAIN**

## उल्हासनगर महानगरपालिका

### पर्यावरण विभाग

**जाहीर आवाहन**

उल्हासनगर शहरातील नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, उल्हासनगर शहरात हवा, जल, वायु तसेच ध्वनी प्रदुषण होत असल्याची बाब आढळुन आल्यास त्यांना टोल फ्री १८००२३३११०३ या क्रमांकावर प्रदुषणासंदर्भात तक्रार नोंदविता येईल.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-
(मदन सोंडे)
उप-आयुक्त (पर्यावरण)
उल्हासनगर महानगरपालिका**

जा.क्र.उमपा/पिआरओ/३९१/२०२१
दिनांकः ०८/०९/२०२१

## PANVEL MUNICIPAL CORPORATION PANVEL

### TENDER NOTICE (Extention- II)

**Tender No. : PMC/MOH/12/2021-22** **Date: / /**

Online bids are invited from bidder for purchase of the following items on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here - in - after called the CORPORATION) and will be received online on the website **www.mahatenders.gov.in** as per time schedule (key dates) in the notice published on the above website. Tenders are being invited from eligible contractors for "The laundry services for the COVID Care Center (CCC) situated at India Bulls Building and more CCCs, dedicated COVID Health Centers (DCHCs), dedicated COVID hospitals (DCHs) if formed".

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Deposit (Rs.) | Cost of tender form (Rs.) | Period of work |
|---|---|---|---|---|
| 1 | E-TENDER for laundry Services works at Panvel COVID Care Center. | Rs.1,00,000 | Rs.10,000/- + GST | Twelve months or till the COVID Care facilities is existing whichever is later. |

Key Dates-

| Sr. No. | Description | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publish Date | 18/08/2021 | 12:00 |
| 2 | Document Download Start Date | 18/08/2021 | 12:00 |
| 3 | Document Download End Date | 02/09/2021 | 15:00 |
| 4 | Pre Bid Meeting | Only Online queries upto 23/08/2021 | 15:00 |
| 5 | Bid Submission Start Date | 18/08/2021 | 12:00 |
| 6 | Bid Submission End Date | 02/09/2021 | 15:00 |
| 7 | Bid Opening Date | 03/09/2021 | 11:00 |
| 8 | Extention for Bid submission end Date | 17/09/2021 | 15:00 |
| 9 | Pre-Bid for extension | Only Online upto 13/09/2021 | |
| 10 | Extensive Bid opening Date | 20.09.2021 | 11:00 |

**Note -** The bidders shall have to submit their bids online and upload the relevant documents as per key schedule (key dates)

Please ask online Pre Bid queries on **panvelcorporation@gmail.com**

1. Tender documents can be purchased online from **www.mahatenders.gov.in** by making online payment as specified above as per key dates. The bidders shall have to submit their Bids online and uploads the relevant documents from as per time schedule.
2. The form fee and earnest money deposit will be accepted online.
3. Conditional tenders will not be accepted and liable to be rejected.
4. The Particular of tender procedure will be available on website **https://mahatenders.gov.in**, In case of any problem please contact helpline no.0222-7458040/ 41-42, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 (Morning 10:00 Hrs to Evening 18:00 Hrs).
5. The Commissioner reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reason thereof.

Place-
Date-

**Sd/-
Additional Commissioner
Panvel Municipal Corporation**

जा. क्र. पमपा/जनसंपर्क./३१२१/प्र.क्र.१५८/३२५/२०२१

## दि न्यू इन्डिया एश्योरन्स एम्प्लॉइज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड

दि न्यू इन्डिया एश्योरन्स बिल्डिंग, पाचवी मंजिल, 87, एम. जी. रोड, मुंबई - 400 001. टेलि.: 2270 8498
**THE NEW INDIA ASSURANCE EMPLOYEES' CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.**
New India Assurance Building, 5th Floor, 87, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2270 8498

### सुचना
### ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि न्यू इंडिया ॲश्युरन्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई या संस्थेची ६५वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सींग (VC) अगर व्हिडिओ व्हिज्युअल मिन्सद्वारे (OAVM) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र : संकीर्ण २०२०/ प्र.क्र. २४/१३-स दि. २५ फेब्रुवारी २०२१ याला अनुसरुन आयोजित केली आहे. कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणुच्या प्रादुर्भावामुळे सभेच्या ठिकाणी सभासदांना प्रत्यक्ष हजर राहणे अपेक्षित नाही. सदर सभा कॅन्टीन हॉल, मुख्य कार्यालय येथे घेण्यात येईल. सदर सभेस सभासदांनी ऑनलाईन उपस्थित रहावे. सदर सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून उपकृत करावे, ही विनंती.

१. मागील वार्षिक सर्व साधारण सभेचे ६४ व्या इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. दिनांक ३१/०३/२०२१ अखेर अंतर्गत हिशेब तपासनीसांनी दिलेला अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक वाचून त्यास मंजूरी देणे.
३. सन २०२०-२०२१ वर्षासाठीच्या नफा विभागणीला मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०२१-२०२२ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.
५. सन २०२१-२०२२ सालाकरिता शासकीय प्रमाणित लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
६. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.
७. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजुर करणे. आभार प्रदर्शन व समारोप.

**श्रीमती. शर्वरी शेटये
मानद सचिव**

**सूचना :**

१. सभेच्या नियोजित वेळेत गणपुर्ती न झाल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब केली जाईल व व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) / अगर व्हिडिओ व्हिज्युअल मिन्सद्वारे (OAVM) घेण्यात येईल. जेवढे सभासद या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गणसंस्था मोजताना ग्राह्य धरली जाईल.
२. गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.
३. कृपया ही सूचना व्यक्तिगत सूचना म्हणन समजावी.
४. सभासदांना सोसायटीच्या हिशोबाबाबत काही विचारणा करावयाची असल्यास त्यांनी सभेपूर्वी कमीत कमी ३ दिवस अगोदर सोसायटीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सूचना दयावी.
५. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर लाभांश सप्टेंबर २०२१ च्या पगारातून दिला जाईल.
६. ज्या सभासदांना आपला सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, व २०१९-२०२० या वर्षीचा लाभांश मिळाला नसेल त्यांनी कृपया सोसायटीच्या कार्यालयातून लाभांशाचा धनादेश घेऊन जावा.
७. ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पध्दतीने उपस्थित राहण्यासाठी सभासदांना नोंदणीकृत ई-मेल आयडी अथवा मोबाईल क्रमांकावर लॉगिन आयडी व पासवर्ड दि. २३/०९/२०२१ पर्यंत पाठविण्यात येईल. त्यासाठी सभासदांनी दि. २१/०९/२०२१ पर्यंत त्यांचे ई-मेल आयडी, अथवा मोबाईल क्रमांक, नाव व सभासद क्रमांकासह संस्थेच्या newindia.creditsociety@newindia.co.in या ई-मेल आयडीवर द्यावेत. उपरोक्त माहिती उपलब्ध झाल्याशिवाय आपणांस सभेस उपस्थित राहण्याची लिंक पाठविणे तांत्रिकदृष्टया शक्य होणार नाही.
८. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन याद्वारे सभासद हया वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.

**दिनांक :०८/०९/२०२१**
**ठिकाण : मुंबई**

शिक्का

BYP

## विक्रमगड नगरपंचायत, विक्रमगड

ता. विक्रमगड, जि. पालघर

**ई–निविदा सूचना – NPV/1/811/2021 For 2021-22**

मुख्य अधिकारी विक्रमगड नगर पंचायत बांधकाम विभागाकडील विविध विकास कामांकरिता शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई–निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | कोरे निविदा फॉर्म डाऊनलोड करणे. | दिनांक ०९/०९/२०२१ १५.०० वाजल्यापासून ते ०४/१०/२०२१ ११.०० वाजेपर्यंत. |
| २ | निविदा अपलोड करणे. | निविदा प्रसिध्दी पासून दिनांक ०४/१०/२०२१ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| ३ | स्वीकृत निविदा उघडणे. | दिनांक ०५/१०/२०२१ १०.०० वाजेपासून शक्य झाल्यास |

सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०९/०९/२०२१ १५.०० ते ०४/१०/२०२१ सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या ई–निविदा ०४/१०/२०२१ सकाळी ११.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. तसेच वैध निविदा शक्य झाल्यास ०५/१०/२०२१ १०.०० वा. पासून उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती :**

१) ठेकेदारांनी ई–निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा, तसेच क्र. १ च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबीची कागदपत्रे स्कॅन करुन पी.डी.एफ. फॉर्मेट (PDF Format) मध्ये अपलोड करावीत. लिफाफा क्र. २ हा आर्थिक बोलीचा असेल.
२) निविदा फॉर्म फी व इसारा **e-Payment** पध्दतीने स्वीकारण्यात येतील.
३) इतर सविस्तर अटी व शर्ती ई–निविदा फॉर्ममध्ये **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर व न.प. कार्यालय नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.
४) अपलोड केलेल्या कागदपत्रांची मूळ प्रत पडताळणीकरिता व झेरॉक्स दिनांक ०५/१०/२०२१ रोजी पर्यंत आवक विभागात बंद लिफाफ्यात सकाळी १०.०५ वाजेपर्यंत सादर करणेची आहे.

| सही/– | सही/– | सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|---|---|
| **नगर अभियंता** | **मुख्य अधिकारी** | **सभापती सार्व. बांधकाम समिती** | **उप नगराध्यक्ष** | **नगराध्यक्षा** |

## INDIAN RAILWAY CATERING & TOURISM CORPORATION LTD.

(A Government of India Enterprise-Mini Ratna)
CIN. No.-L74899DL1999GOI101707
NOTICE INVITING E-TENDER

**Tender Notice No. IRCTC/WZ/SLR/TEJAS/2021 dtd. 01.09.2021**

IRCTC, West Zone, Mumbai Office, CSMT for and on behalf of The President of India invites open e-tender, for leasing of Parcel space (3.9 tonnes) in LWLRRMs on single trip basis per day in IRCTC run Tejas Express for a period of 1 year. The train runs 6 days in a week (no service on Thursday). Details are mentioned below.

Tender Document cost and Earnest Money Deposit shall be accepted only through online Net Banking or E-payment gateway.

| Sr. No. | Train No. | Train Name | From/To | RP per Trip (in Rs.) | No of Trips (Max) | EMD (in Rs.) | Cost of Tender Document |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 82901-Rear WLRRM | Tejas Exp | MMCT-ADI | 2,949 | 313 | Rs. 1,00,000 | Rs. 1000/- |
| 2 | 82902-Rear WLRRM | Tejas Exp | ADI-MMCT | 2,949 | 313 | Rs. 1,00,000 | Rs. 1000/- |

**Date & Time of submission of Tender: - up to 28.09.2021 at 11:00 hrs**

**Date & Time of opening of Tender on: 28.09.2021 At 11:30 hrs.**

**Development Charges & GST (presently @ 2% & 5% respectively) are additionally applicable over & above the quoted rates.**

Tender Document viewing & downloading can be done on website: www.irctc.com & **www.tenderwizard.com/IRCTC**. However, submission/uploading can only be done on **www.tenderwizard.com/IRCTC.**

Note: All Amendment / Corrigendum will be uploaded only on above mentioned website. Hence, bidders are requested to visit the site regularly.

Note: Leave @ 1 day per 30 trips is applicable; tenderer may/may not opt for this. Loading & unloading point is at Vadodara & Surat only. Halt time at these stations is 5 minutes.

Presently the services are running 4 days in a week (Friday, Saturday, Sunday & Monday); License fees shall be pro-rata thereto.

**For any queries regarding NIT, kindly contact: 022-674-53239, 8287931627.**

**Indian IRCTC Catering and Tourism Corporation Ltd.**

**West Zone, 2nd floor, New Administrative Building, CSMT, Mumbai-400001**

# चंदेरी च्वींगम

## 'परीस'चे 'गूढ' आले समोर



ग्रामीण कथेवर आधारित रहस्यमय 'परीस' नावाची वेबसिरीज 'प्लॅनेट मराठी ओटीटी'वर प्रदर्शित झाली असून तिला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या वेबसिरीज मधील 'गूढ' हे प्रेमगीत प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. या गाण्याचे बोल आणि संगीत निरंजन पेडगावकर यांचे असून जयदिप वैद्य यांनी हे गाणे गायले आहे. ग्रामीण कथा असलेल्या 'परीस'मधील या गाण्याचे बोल अतिशय श्रवणीय असून यातील ग्रामीण लहेजा आणि गावरान शब्द विशेष लक्षवेधी आहेत. लोखंडास परीसाचा स्पर्श झाल्यास त्याचे सोने होते. ही गोष्ट गावातील काही लोकांना समजते आणि ते परीसाच्या शोधात निघतात. या शोधादरम्यान एका तरुण-तरुणीचे एकमेकांवर प्रेम जडते. त्यांच्या या प्रेमाचा प्रवास आपल्याला 'गूढ' या प्रेमगीतामधून पाहायला मिळतो. त्यांना तो परीस सापडतो का, तो मिळवण्यासाठी ते कोणत्या थराला जातात, त्या जोडप्याचे पुढे काय होते, या आणि अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांसाठी प्रेक्षकांना 'परीस' पाहावी लागेल.



'मन झालं बाजिंद' या मालिकेला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळतोय. त्यातील रांगडा नायक आणि सुंदर नायिका यांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. अभिनेता **वैभव चव्हाण** हा या मालिकेत प्रमुख भूमिका साकारतोय. याच पार्श्वभूमीवर त्याच्याशी केलेली बातचीत...

## या भूमिकेसाठी मी परफेक्ट ठरलोय

**वैभव, बाजिंद हा काय प्रकार आहे?**

- माझ्या मते बाजिंद म्हणजे लढवैया, बिनधास्त आणि जिद्दी व्यक्तिमत्व. मी या मालिकेत रायाची भूमिका साकारतोय जो हळदीच्या कारखान्याचा मालक आहे आणि स्वतःच्या मेहनतीने आणि जिद्दीने राया स्वतःच्या पायावर उभा आहे आणि त्याने नाव आणि सन्मान मिळवला आहे. तो खूप जिद्दी आहे आणि रायाच्या व्यक्तिमत्वावरूनच या मालिकेचे नाव बाजिंद ठेवण्यात आले आहे.

**काय आहे या मालिकेत सांगशील?**

- आपण आजवर कायम पाहत आलोय की प्रेमाचा रंग हा गुलाबी असतो. पण या मालिकेत प्रेमाचा रंग आम्ही पिवळा दाखवलाय. पिवळा या हा रंग बुद्धीचे, मांगल्याचे आणि समृद्धीचे प्रतीक आहे. आपल्या संस्कृतीमध्ये पिवळ्या रंगाच्या हळदीला खूप मान असतो. या मालिकेतील नायक राया याचा हळदीचा कारखाना आहे. त्याच्या कामाचा पसारा खूप मोठा आहे आणि राया स्वभावानेही प्रेमाची उधळण करणारा आहे. तो खऱ्या अर्थाने बाजिंद आहे. तसेच मामा मार्मीकडे राहणारी कृष्णा ही संयमी आणि विचार करून वागणारी आहे. या दोघांची एक प्रेमकहाणी बेधुंद, बेभान अशी आहे.

**या व्यक्तिरेखेसाठी तू काही खास तयारी केलीस?**

- रायाची व्यक्तिरेखा ही माज्यापेक्षा खूप वेगळी आहे. रायाची वागणे, बोलणे, चालणे हे खूप वेगळं आहे. त्यामुळे त्याकडे मी खूप लक्ष दिलेय. राया खूप बिनधास्त आहे आणि उधळण करणारा आहे. प्रत्येक आईला रायासारखा मुलगा हवा, प्रत्येक तरुणाला रायासारखा मित्र हवासा वाटतो. रायासारखी प्रेम करणारी व्यक्ती आपल्या आयुष्यात हवी असे वाटणारी हवीहवीशी आणि आपलीशी वाटणारी भूमिका आहे. ही भूमिका चोख निभावण्यासाठी मी स्वतःमध्येही काही बदल केले. राया आणि माज्यामध्ये साम्य असे आहे की मी स्वतः शेतकरी आणि गावाकडचा आहे त्यामुळे रायाच्या व्यक्तिमत्वातील पैलू मला आत्मसात करणे सोपे गेले.

**या मालिकेसाठी तुझी निवड कशी झाली?**

- अभिनयाची गोडी मला आधीपासूनच आहे. मी एक चांगल्या संधीची वाट बघत होतो. त्यामुळे मी अनेक ठिकाणी ऑडिशन दिले होते. अशातच मला या मालिकेच्या ऑडिशनसाठी कॉल आला. या मालिकेचे निमार्ते तेजपाल वाघ यांना माझा रांगडा लुक आवडला, जो त्यांना राया या व्यक्तिरेखेसाठी अपेक्षित होता. त्यांना माझे ऑडिशनसुद्धा आवडले. अशा प्रकारे माझी मालिकेसाठी निवड झाली.


**प्रोमोज आल्यापासूनच मालिकेची खूप चर्चा आहे, प्रेक्षकांकडून काय प्रतिक्रिया मिळत आहेत?**

- मी या मालिकेमध्ये प्रमुख भूमिका निभावतोय हे मी आधी कोणालाच सांगितले नव्हते. त्यामुळे जेव्हा मालिकेचा प्रोमो रिलीज झाला तेव्हा माज्या ओळखीतील सगळ्यांसाठी हे खूप मोठे सरप्राईज होते. तसंच मालिकेत दाखवण्यात आलेला पिवळा रंग, मालिकेचे नाव, बाजिंद शब्दाचा अर्थ, प्रोमोमधील बॅकग्राऊंड म्युझिक या सगळ्याची चर्चा प्रोमोज रिलीज झाल्यापासूनच होत होती. त्यावरून आम्हाला प्रेक्षकांची उत्सुकता दिसत होती आणि त्यांची मालिकेसाठीची आतुरता पाहून आम्हाला खूप छान वाटले.

## 'हवाहवाई'साठी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचा स्वरसाज!

गेली अनेक दशकं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलेल्या, सदैव सळसळते उत्साही व्यक्तिमत्त्व असलेल्या सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी वयाच्या ८८व्या वर्षी मराठी चित्रपटासाठी पुन्हा एकदा आवाज दिला आहे. महेश टिळेकर दिग्दर्शित आगामी 'हवाहवाई' या चित्रपटातील उडत्या चालीचे गाणे आशाताईंनी गायलं असून, या चित्रपटाच्या निमित्ताने बऱ्याच वर्षांनंतर त्यांनी मराठी चित्रपटासाठी पार्श्वगायन केले आहे. 'हवाहवाई' या चित्रपटाची निर्मिती मराठी तारका प्रॉडक्शनच्या महेश टिळेकर आणि नाईंटी नाईन प्रॉडक्शनच्या विजय शिंदे यांनी केली आहे. पंकज पडघन यांनी चित्रपटाचं संगीत दिग्दर्शन केलं असून महेश टिळेकर यांनीच लिहिलेल्या 'जगण्याची ही मजा घेऊया नव्याने, जाऊया पुढे पुढे साऱ्यांच्या साथीने दिशा नव्या वाटे हव्या, साद देती आता उडण्याची...' असे शब्द असलेलं गाणं वयाची ८८ वर्षे पूर्ण करणाऱ्या आशाताई भोसले यांच्या सुमधुर आवाजात ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.





## दीपिका बनली बिझनेसवुमन

ग्लोबल इंडियन आयकॉन दीपिका पादुकोणने आज आपल्या लाइफस्टाईल ब्रँडची स्थापना करत असल्याची घोषणा केली आहे. लवकरच त्याचे अनावरण करण्यात येणार आहे. एक असा ब्रँड, ज्याची मुळे भारतात असली, तरीही तो जागतिक पातळीवर पोहोचेल आणि त्याला एक वैश्विक अपील असेल; अगदी दीपिकाच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रवासाप्रमाणे! या ब्रँडची पहिली श्रेणी सौंदर्य आणि त्वचेच्या देखभाल उत्पादनांवर केंद्रित असून ही श्रेणी खासकरून भारतात रुजलेली आणि विज्ञानाधिष्ठित असेल. दीपिका पदुकोण जगातील सर्वात प्रशंसनीय कलाकारांपैकी एक असून २०१८ मध्ये टाइम मासिकाने जगातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक म्हणून नामांकित केले होते. सोशल मीडियावरील सर्वात मोठ्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या दीपिकाकडे १०० दशलक्षाहून अधिक वापरकर्त्यांचा विशाल डिजिटल फुटप्रिंट आहे. हा ब्रँड २०२२ पासून उपलब्ध होण्याची आशा आहे.

## 'हे गणराया' गाणे प्रेक्षकांचे मन जिंकणार

कोरोनाचे सावट अजूनही दूर झालेले नाही. त्यामुळे प्रत्येक सण, उत्सव साध्या पद्धतीनेच साजरे करावे लागत आहेत. दरवर्षी सार्वजनिक मंडळांमध्ये किंवा घरांमध्ये गणेशोत्सवाची ठराविक गाणी लावली जातात. विशेष म्हणजे यातली काही गाणी अशी आहेत ज्यांची नवलाई तसूभरही कमी झालेली नाही. चांगली गाणी लोकांच्या कायम स्मरणात राहतात. असेच एक वेगळ्या धाटणीचे 'हे गणराया' हे गाणे निमार्ते अँजेला आणि तेजस भालेराव घेऊन आले आहेत. 'पीबीए म्युझिक' अंतर्गत या गाण्याचा टिझर नुकताच सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. 'पीबीए म्युझिक'ने या आधीही 'विठ्ठला विठ्ठला', 'नखरा' या



गाण्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली होती. यात भर घालत हे नवे गाणेही प्रेक्षकांच्या मनावर राज्य करेल असा निर्मात्यांचा दावा आहे. हे गाणे गायक आदर्श शिंदे आणि गायिका श्रावणी महाजन यांनी गायले आहे, तर या गाण्याचे बोल संग्राम पाटील आणि मयुरेश शिंदे यांनी लिहिले आहेत. संगीत व दिग्दर्शन मयुरेश शिंदे याने केले आहे. आरजे सुमित, अभि रोकडे, अनिकेत शिंदे, विवेक तलवार, निखिल वाघ, हर्षदा वाघ, विवेक केसरकर, दुर्वा साळोखे, श्वेता भारगुडे या सर्वांच्या नृत्याने या गाण्याची रंगत वाढली आहे. नुकताच या गाण्याचा टिझर प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. त्यानंतर आता ७ सप्टेंबरला हे गाणे 'पीबीए म्युझिक'वर प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे.

## 'बाप्पाची आरास करूया' गाणे प्रेक्षकांच्या भेटीला



ए. के. प्रोडक्शनच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी गणपतीच्या गाण्याची निर्मिती गणेशोत्सवादरम्यान केली जाते. यावर्षीही अरुण काशीद यांनी बाप्पाची आरास करूया... हे गणपती बाप्पाचे व्हिडिओ गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आणले आहे. या गाण्याचे चित्रीकरण काहीच दिवसांपूर्वी इचलकरंजी येथील गोविंदराव हायस्कूलमध्ये पार पडले आहे. या गाण्याची निर्मिती, दिग्दर्शन आणि गीत लेखन अरुण काशीद यांनी केले असून त्याला अभिमन्यू कार्लेकर यांनी संगीत दिले आहे. निखिल मधाळे यांनी याचे गायन केले. याचे ध्वनिमुद्रण राधिका डिजिटल होगाडे जॉबवर येथे पार पडले. यात विक्रम खांडेकर यांनी प्रमुख भूमिका केली आहे. हे त्याचे पहिलेच गाणे आहे. फोटोग्राफीचा व्यवसाय सांभाळत नेहमी कॅमेऱ्याच्या मागे राहणारे विक्रम खांडेकर यांना या गाण्यात कॅमेऱ्यासमोर येऊन काम करण्याची संधी मिळाली आहे. अभिनयाची कोणतीही माहिती नसताना त्यांनी या गाण्यात जीव ओतून काम केले असून या गाण्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक नवोदित आणि जुन्या कलाकारांनीही यात काम केले आहे. ध्वनिमुद्रण, संकलन, नृत्यदिग्दर्शन, मांडणी, सजावट, नृत्य आणि चित्रीकरण यामुळे हे गाणे प्रेक्षकांना आवडेल हे नक्की.

## 'चीकू की मम्मी दूर की'मध्ये सुधा चंद्रन यांचा कॅमिओ



'चीकू की मम्मी दूर की' या स्टार प्लसच्या नवीन मालिकेची आतुरतेने वाट पाहत होते. सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्यासोबत अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या या मालिकेच्या प्रोमोने मालिकेबाबत सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. मालिकेचे निर्माते दर्शकांना आणखी एक आश्चर्याचा सुखद धक्का देण्याच्या तयारीत असून कदाचित आणखी एक दिग्गज कलाकार मालिकेत एंट्री घेताना दिसू शकेल. ताज्या बातमीनुसार निर्माते प्रसिद्ध अभिनेत्री सुधा चंद्रनला आणण्याची योजना बनवत आहेत. आपल्या उत्कृष्ट अभिनय आणि नृत्यासाठी ओळखली जाणारी गुणी अभिनेत्री सुधा चंद्रन या मालिकेत एक कॅमियो करताना पाहता येईल.

## डेहराडून चित्रपट महोत्सवात 'संक्रमण'

'डेहराडून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'त येथील आशिष निनगुरकर लिखित 'संक्रमण' या लघुपटाची निवड झाली आहे. या महोत्सवात 'संक्रमण' लघुपटाला एकूण ५ नामांकने मिळाली आहेत. गणपती उत्सवाच्या निमित्ताने अनेक लोक एकत्र येतात व ते कोरोनाकाळात नियम पाळत नाहीत, त्यामुळे जो काही प्रसंग ओढवतो,त्यावर हा लघुपट भाष्य करतो. येत्या १७ ते १९ सप्टेंबर रोजी डेहराडून येथे हा फिल्म फेस्टिवल होणार आहे. या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आलेल्या एकूण ११६७ लघुपटांमधून 'संक्रमण' लघुपटाला 'सर्वोत्कृष्ट सामाजिक लघुपट-संक्रमण, सर्वोत्कृष्ट निर्मिती-काव्या ड्रीम मुव्हीज, सर्वोत्कृष्ट विषय-संक्रमण, सर्वोत्कृष्ट अभिनेता- प्रदीपकडू आणि सर्वोत्कृष्ट लेखक- आशिष निनगुरकर' असे एकूण पाच नामांकने जाहीर झाले आहेत व तिथे मान्यवर कलाकारांच्या उपस्थितीत या लघुपटाचे स्क्रीनिंग देखील होणार आहे.




## इंडियन आयडॉल आता मराठीत

प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात सोनी मराठी वाहिनी नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता सोनी मराठी वाहिनी पहिल्यांदाच 'इंडियन आयडॉल - मराठी' घेऊन येते आहे. 'इंडियन आयडॉल - मराठी'मुळे स्पर्धकांच्या कलागुणांना वाव मिळेल आणि प्रेक्षकांचं मनोरंजनही होईल.




'इंडियन आयडॉल'ची आत्तापर्यंत अनेक पर्व झाली आहेत, ज्याला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला आहे आणि त्यातून देशाला अनेक कलाकारही मिळाले आहेत. आता 'इंडियन आयडॉल - मराठी' या कार्यक्रमामुळे महाराष्ट्रातला आवाज घराघरांत पोचणार आहे आणि आपली कला सादर करण्यासाठी स्पर्धकांना हक्काचा मंच मिळणार आहे. सोनी मराठी वाहिनीच्या प्रेक्षकांना 'इंडियन आयडॉल - मराठी' लवकरच पाहायला मिळणार आहे.

# महाशब्दकोडे-२३२८



**आडवे शब्द -** १. देशातले, स्वदेशी ५. मुनीचे घर ८. औट घटकेचे राज्य मिळाल्यावर दानधर्म करणारा राजा १२. तीन बाजू व तीन कोन असलेली आकृती १३. महाभारतातील एक नाग १५. निसर्गसौंदर्य १७. विक्रीचा दर १८. फणस १९. त्रास २०. शल्य २२. जिंकलेली भूमी २४. यकृताचा गंभीर आजार २५. डोंगरांच्या मधला अरुंद रस्ता २६. आरोग्यदायी २७. संक्रांतीचा हलवा २९. बिचारा ३१. मस्तक ३४. सोय, व्यवस्था ३६. निषेध ३७. बरखास्त ३९. चारचौघांहून निराळा ४०. फूटपाथवरचे दुकान ४२. निकष न लावता केलेली निवड ४४. एकाग्र नजर ४६. रात्री स्वयपाकघरात केलेली आवराआवर ४८. उत्तराधिकारी ४९. परका ५०. कमी वेळात ५४. गणेशमूर्तीसाठी वापरली जाणारी माती ५५. शुद्ध चारित्र्याचा ५७. पर्वत ६०. माळेतील घटक, गोलक ६१. शाळेतले ६३. होऊन गेलेले ६४. न्याय, रसिकाने दिलेली वाहवा ६५. आपोआप ६७. मित्र ६८. गंधतुलसी, मरुबक, लांब केस असलेल्या स्त्रिया वेणीत गुंफतात ७०. सारखा ७३. यंत्रातील बटन, वेदनेची चमक ७४. अधोलोक, पाताळलोक ७६. पुष्टी करणारे ७७. बंधन ७८. वस्त्र ८०. श्रीकृष्णाची एक पत्नी ८१. सूर्योदयाची दिशा ८२. राजाचा लेखनिक ८४. खळगा ८६. पाणी ८८. नामस्मरण ९०. गणपतीचा नैवेद्य ९३. शरमिंदा ९५. सोंग, सबब ९६. मुसळधार पावसामुळे डोंगराचा तुटलेला भाग ९८. वाटप ९९. संपर्क १००. प्रिय व्यक्ती दूर जाणे १०१. कर्ज १०२. मोठा भाऊ १०३. प्रथा १०४. शासन १०५. तजेला, प्रफुल्लता १०६. हौतात्म्य १०७. शिजवलेला भात

**उभे शब्द -** १. ऐक्यभावना २. पीकात उगवलेले गवत ३. गार, थंड ४. कुबेराचा सेवक ६. सुरेल ७. आपला अदृश्य अवयव ९. सत्तापालटासाठी मोठी बंडाळी १०. बाकी, शिल्लक ११. दूधविक्रेती १२. सार्वकालिक सत्य १४. वाडगा १६. संन्यासी १७. आगामी १९. अस्थी २१. नाकातला छोटासा दागिना २३. शिव्याशाप २४. हरीण २५. भिंतीला पडलेले भगदाड २६. आळस न करणारा, कामसू २८. मनातली गोष्ट ३०. ठाम ३१. शेंडी ३२. नेहमी आजारी पडणारा ३३. खेळती हवा असलेली जागा ३५. जतन ३८. उंट हाकणारा ३९. लहान झालेले, आकुंचन पावलेले ४१. न जेवलेला ४३. बरोबरी, पावसाचा शिडकावा ४५. उपजत आवड ४६. केरसुणी ४७. लेखणीच्या सहाय्याने एखाद्याचे खूप नुकसान करणारा कर्मचारी ४९. पय ५०. कामकाज थांबवण्याचा आदेश ५२. दैवी देणगी ५३. शिळे वर्तमानपत्र ५४. विज्ञान ५६. व्यापारी ५८. पद्धतशीर ५९. उभट पातेले ६१. उपकचेरी ६२. मृत्यूची देवता ६३. स्त्री, कुंभाराची भट्टी ६५. कामाचा कंटाळा ६६. स्वर, बोलण्याचा रोख ६७. वाऱ्यामुळे झाडांच्या पानांचा होणारा आवाज ६९. ताकद ७१. मर्कट ७२. अशक्त, रोड ७३. सळईवर भाजलेले खमंग पदार्थ ७५. पगडा ७६. वाडवडील ७७. एक द्रवरूप धातू ७९. मोठी नदी ८३. बंडखोरांचा पराभव ८५. रखवाली करणारा ८६. ढग ८७. चप्पल ८९. साडीचे सुटे टोक ९१. अवघड ९२. घोड्याची निगा राखणारा ९४. तरट ९५. भिंतीतील गुप्त पोकळ जागा ९७. गुपित १००. वेगळे १०१. वेदांपैकी एक १०३. गुप्तचर •

**महाशब्दकोडे क्रमांक २३२७ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. अवगत ५. सुगी ८. नातलग ११. सुकडा १२. पलांडू १४. तपमापक १६. वड १७. रमणीय १९. काकडा २१. डर २३. बूच २४. साजण २५. यजमान २७. राबता २९. कोलकाता ३१. नस ३२. खडूस ३३. घोळ ३५. गजबजाट ३७. लाभ ३९. कडे ४०. पूर्वज, महालयश्राद्ध ४२. डर ४४. टाप ४६. स्वास्थ्य ४७. टप ४८. पडदा ५०. पारावार ५२. प्रतिकार ५४. खाणे ५६. मस्तक ५८. हमखास ५९. रेकी ६०. पैज ६१. खरा ६२. तरू ६३. नाक ६४. हरणकाळजी ६६. आकाशगंगा ६८. शैल ६९. सारण ७०. तळमळ ७१. शश ७२. चवळी ७३. सलील ७६. आरवसा ७८. लोड ७९. न्यारा ८१. कलह ८३. लहानपण ८५. मलूल ८६. सफल ८७. समंजस ८८. लता ८९. कनवट ९०. विक्री ९१. मदत ९३. सह ९४. पेढी ९६. रडार ९८. मामुली ९९. मंदवासर १००. सारमेय १०२. जादा १०३. वादी

**उभे शब्द :** १. दिसेनासा २. अकारण ३. गर्हणीय ४. नाक कान ६. गीत ७. देमार ८. नाकबूल ९. लव १०. गडवा १३. डाक १५. पडता १८. यजन २०. डाराडूर २३. चकाट्या पिटणे २४अ. जहाज २६. मासला २८. बस २९. कोळ ३०. विजार ३३. घोडेस्वार ३४. मोर ३५. गडप ३६. बडदास्त ३८. भटारखाना ४१. तप ४३. वराह ४५. अतिरेक ४९. डमरू ५१. वाम ५३. काकी ५४. खाजण ५५. पराजीत ५७. कळीकाळ ६०. पैरण ६१. खळ ६२. तडित ६३. नाल ६४. हरळी ६५. काबुली ६६. आमटी ६७. गंगा ६८. शैशव ६९. सावधानता ७१. शरपंजर ७३. सड ७४. लयलूट ७५. टोल ७७. साल ७८. लोणकढी ८०. रासक्रीडा ८१. कलम ८२. हसतमुख ८४. हालहवाल ८५. मवसर ९०. विरस ९२. दमा ९३. सद ९४. पेरणी ९५. वय ९७. रजा ९९. मंदी १००. साठा १०१. मेघ

## प्रताप सरनाईक अनधिकृत बांधकाम प्रकरणी २१ कोटींचा दंड वसूल करा

■ ठाणे

**भाजप** नेते किरीट सोमय्या यांनी ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा यांची भेट घेत, यावेळी त्यांनी शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांच्या अनधिकृत बांधकामांप्रकरणी त्यांच्याकडून २१ कोटी रुपये वसूल करावे, अशी मागणी केलीआहे. किरीट सोमय्या यांनी ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा यांची भेट घेतल्यांनंतर यावेळी त्यांनी प्रताप सरनाईक यांच्या अनधिकृत बांधकामांबाबत त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सोमय्या यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी,विहंग गार्डन इमारतमधील लोकांची लवकरात लवकर सुटका करण्याची मागणी त्यांच्याकडे केली असल्याचे ते म्हणाले. तसेच सरनाईक यांच्या अनधिकृत बांधकामांबाबत पालिकेने त्यांच्याकडून २१ कोटी रुपयांचा दंड वसूल करावा अशी मागणी आयुक्तांना केली असल्याचेही त्यांनी सांगितले.त्याचाच पाठपुरावा करण्यासाठी मी आज आलो होतो, असे सोमय्या म्हणाले. दरम्यान, सरनाईक यांच्याकडून अद्यापही हा दंड वसूल झाला नसून, ठाकरे सरकार सरनाईक यांच्याकडून २१ कोटी दंड का वसूल करत नाही? सरनाईक यांच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई कधी करणार? असा सवालही त्यांनी यावेळी केला. या कारवाईबाबत राज्य सरकारशी चर्चा करून लवकरच पावले उचलणार असल्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मिलिंद नार्वेकर यांचा बंगला तोडला गेला, आता अनिल परब यांचे ऑफिस तुटणार आणि प्रताप सरनाईक यांच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई होणार यासाठी मी ठाणे महापालिका आयुक्त यांना भेटायला आलो आहे, असे त्यांनी सांगितले.

## मनसे शहर अध्यक्ष गजानन काळेंना हायकोर्टाचा अटकपूर्व जामीन मंजूर

**मुंबई- मनसेचे** नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांना हायकोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. घरगुती हिंसाचार प्रकरणात दाखल गुन्ह्यात काळे यांना हायकोर्टाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. पत्नीचा मानसिक, शारिरीक छळ, मारहाण आणि परस्त्रीबरोबर अनैतिक संबंध असल्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झालेल्या गजानन काळे यांच्या अटकपूर्व जामीनावर न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी आपला राखून ठेवलेला निकाल बुधवारी जाहीर केला. दरम्यान, नवी मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या या गुन्ह्यात अडकलेल्या मनसेचे नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांना या निकालामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. आपल्याविरोधातील सर्व आरोप चुकीचे असून हा निव्वळ पतीपत्नी यांच्यातील बेबनाव असल्याचा प्रकार आहे असे काळे यांच्यावतीने हायकोर्टात सांगण्यात आले होते. काळे यांच्या पत्नीने काही दिवसांपूर्वी नेरूळ पोलीस ठाण्यात याबाबत रितसर तक्रार दाखल केली होती.


**जाहीर सुचना**

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, १) श्री दत्तात्रय मारुती खामकर, २) श्री कन्हैयालाल बालजी जोशी संचालक, चंद्रगुप्त ईस्टेट प्रायव्हेट लिमिटेड, सी.टी.एस नं. ६५४, सर्व्हे नं.४१, प्लॉट नं. बी–५५, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबई – ४०००५३ या जागेचे मोजमापानुसार क्षेत्रफळ १९९० चौ.मी. असे आहे. (मालमत्ता पत्रकानुसार २१०२ चौ.मी) चंद्रगुप्त ईस्टेट प्रायव्हेट लिमिटेड सी.टी.एस. नं. ६५४, सर्व्हे नं. ४१, प्लॉट नं. बी–५५, न्यू लिंक रोड अंधेरी (पश्चिम) मुंबई – ४०००५३, या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासाच्या विरुध्द असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार भवन, सी–२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल,बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ यांच्याकडे जाहीर नोटीस / सूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

सही/–

स्थळ: मुंबई — चंद्रगुप्त ईस्टेट प्रायव्हेट लिमिटेड

दिनांक: ०९/०९/२०२१ — (संचालक)


## महिलांना खेळांमध्ये भाग घेता येणार नाही! तालिबानचा फतवा

**काबुल** - तालिबानने अफगाणिस्तानवर ताबा मिळवला. अनेक फतवे काढले आहेत. महिलांसंदर्भात तालिबानची भूमिका नेहमीच अन्यायकारक राहिली आहे. तालिबानने यापुर्वी अनेक महिलांवर अत्याचार केल्याच्या घटना समोर आल्या असताना, नुकताच काबुलमध्ये पाकिस्तान विरोधात आंदोलन करणाऱ्या महिलांवर तालिबानने हवेत गोळीबार केल्याची माहिती देखील एएफपीने दिली होती. दरम्यान, पुन्हा एकदा तालिबानने महिलांसंदर्भात धक्कादायक निर्णय घेतला आहे. महिलांना खेळांमध्ये भाग घेण्याची गरज नाही. कारण यामुळे त्या माध्यमांसमोर येतील. तालिबानच्या सांस्कृतिक आयोगाचे उपप्रमुख अहमदुल्लाह वासिक यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. तालिबान राजवटीत अफगाणिस्तानमध्ये महिलांना प्रवासास, घराबाहेर पडण्यास बंदी आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी लेखले जाते. तेथे महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत जागतिक महिला आयोगाने देखील चिंता व्यक्त केली आहे. महिलांचे स्वातंत्र्य नष्ट करणारा आणखी एक निर्णय तालिबानने घेतला आहे. तालिबानच्या सांस्कृतिक आयोगाचे उपप्रमुख अहमदुल्लाह वासिक यांनी सांगितले की, अफगाणिस्तानमधील महिलांना क्रिकेट सहित अन्य खेळांमध्ये भाग घेता येणार नाही. अहमदुल्लाह वासिक यांनी स्थानिक माध्यमांशी संवाद साधतांना ही माहिती दिली. यासाठी त्यांनी धक्कादायक कारण देखील सांगितले आहे. अहमदुल्लाह वासिक म्हणाले, महिलांना खेळांमध्ये भाग घेण्याची गरज नाही.

## अमरावतीत ट्रकवर कार आदळली — महिलेचा मृत्यू

**अमरावती** - ट्रकवर भरधाव कार आदळल्याने एक महिला जागीच मृत्यू, तर अन्य एक गंभीर जखमी झाल्याची भीषण घटना अमरावतीतील पथ्रोटनजीकच्या पांढरी रस्त्यावर स्मशानभूमीजवळ बुधवारी दुपारी दीड वाजतादरम्यान घडली.जखमींवर स्मिम हॉस्पिटलमध्ये दाखल केल्याची प्राथमिक माहिती आहे. अंजनगाव सुर्जी येथील समाजसेवक प्रमोद निपाने आणि अंगणवाडी सेविका ललिता चव्हाण हे कारने जात होते. पांढरी रस्त्यावर स्मशानभूमीजवळ वळण रस्त्यावर अचानक ट्रकला भरधाव कारने जोरदार धडक दिली. त्यात ललिता चव्हाण या जागीच ठार झाल्या, तर प्रमोद निपाणे हे गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. याच ठिकाणी दहा दिवसांपूर्वी अपघातझाला होता.


**अर्ज क्र. आयएनसी-२६**

(कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३० अन्वये)

**विभागीय संचालक, पश्चिम विभाग,**
**मुंबई यांच्या समक्ष**

कंपनी कायदा, २०१३, कंपनी कायदा, २०१३ चे कलम १३ (४) आणि कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३०(५)(अ) च्या प्रकरणात

**आणि**

**डैझी ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड,**
नोंदणीकृत कार्यालय - प्रिमायसेस क्र. २०१, २ रा मजला, खेरनगर सर्वोदया सीएचएस ए-विंग, इमारत क्र. ११, खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई महा. ४०००५१ यांच्या प्रकरणात

**... अर्जवार याचिकाकर्ते**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीस त्यांचे नोंदणीकृत कार्यालय "महाराष्ट्र राज्य" येथून "मध्य प्रदेश राज्य" येथे बदलण्यास सक्षम करण्याकरिता २० ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या विशेष ठरावाच्या दृष्टीने कंपनीच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनच्या कलम II मधील बदलास मंजुरी मिळविण्याकरिता, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये केंद्र सरकार (विभागीय संचालक, पश्चिम विभाग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय) कडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे.

कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेले प्रतिज्ञापत्रासह विभागीय संचालक, पश्चिम विभाग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, १०० एव्हरेस्ट, ५ वा मजला, मरीन ड्राईव्ह, मुंबई ४०० ००२ येथे सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या (१४) आत स्वतः किंवा इतर कोणामार्फत पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत अर्जदार कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयास निम्न उल्लेखित पत्त्यावर पाठवावी:

**डैझी ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड,**
प्रिमायसेस क्र. २०१, २ रा मजला, खेरनगर सर्वोदया सीएचएस ए-विंग, इमारत क्र. ११, खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई महा. ४०००५१

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०५.०९.२०२१

**डैझी ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड**
करिता आणि त्यांच्या वतीने
**सही/-**
**मेहमूव खान**
**संचालक**
**डीआयएन: ०००६१२२४**



**ॐ गोराई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., मुंबई**

**रजि. नं. बीओएम्/ डब्ल्यूआर/ आरएसआर/ सीआर/ एनसी/ १००७/ ९५-९६**
**मुख्य कार्यालय :** लॉट नं. २६४/२७९, श्रीजी बंगलो, गणेश मंदिर जवळ, गोराई –१, बोरीवली (प), मुंबई ४०००९१फोन : २८६९१५७५

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की संस्थेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २६/०९/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. शासनाच्या निर्देशानुसार OAVM (Other Audio Visual Medium) द्वारे अध्यक्ष मा. श्री प्रकाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयातून आयोजित करण्यात येत असून सदर सभेत खालील कामकाजावर विचार करण्यात येणार आहे. सभेत सहभाग घेण्यासाठी सभासदांनी आपला ई-मेल आयडी तसेच मोबाईल क्रमांकाची नोंद नजीकच्या शाखेमध्ये किंवा मुख्य कार्यालयात करुन घ्यावी, हि विनंती.

**सभेपुढील कामकाज:**

१) दि. ७ फेब्रुवारी २१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २१ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा –तोटा पत्रकारवर विचार करणे व स्विकृत करणे.
३) सन २०२०–२१ चा अंतर्गत लेखापरिक्षकांचा अहवाल वाचन करणे व स्विकृत करणे.
४) सन २०२०–२१ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाचा विचार करणे व अहवाल स्विकृत करणे तसेच सन २०१९–२० दोष दुरुस्ती अहवाल स्विकृत करणे.
५) कायदा व नियम यास अनुसरुन नफा–विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
६) सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकाची आणि गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील माहिती देणे आणि मान्यता देणे.
७) सन २०२१–२२ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करणे व लेखापारक्षणासाठीच्या मानधनास मान्यता देणे.
८) सन २०२१–२२ सालाकरिता निबंधकानी जाहीर केलेल्या पॅनेलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची चालू आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी नेमणूक करणे व लेखापरिक्षणासाठीच्या मानधनास मान्यता देणे.
९) उपविधी दुरुस्ती करणे.
१०) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

**स्थळ: मुंबई**
**दिनांक : ०९/०९/२०२१**

**आपला सहकारी**
**सही/ -**
**श्री अशोक पालांडे**
**सरव्यवस्थापक**

**सूचना :**
१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल, त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाल व हिशेबाची परिशिष्ट्ये यावार प्रश्न विचारावयाचे असतील, त्यांनी सभेपूर्वी ५ दिवस आधी संस्थेच्या कार्यालयात लेखी द्यावेत. आयत्या वेळी आलेल्या प्रश्नांना उत्तर देणे बंधनकारक राहणार नाही.
३) मागील सालचा लाभांश ज्या सभासदांनी घेतला नसेल तर तो घेऊन जावा, लाभांश जाहीर केल्यानंतर ३ वर्षाच्या आत न घेतल्यास ती रक्कम राखीव निधी मध्ये जमा केला जाईल.
४) संस्थेची अहवाल सालाची आर्थिक पत्रके शाखा कार्यालयात उपलब्ध आहेत.



**लिलाव पुर्व नोटीस**

जाक्र/एस आर ओ/लिलाव पुर्व/नोटीस/२९१/२०२१
विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा एचसीसीएस अर्बन को ऑ क्रेडिट सोसायटी लि.,
४०६/४०८, १ला मजला, सर जे जे मार्ग, मुंबई - ४००००८.
दिनांक : ०८.०९.२०२१
वाचावे (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ व नियम १०७ (५ आय) अन्वये)
संदर्भ : दिनांक ३१.०८.२०१९ रोजीची जप्ती व मानीव तावा
३री लिलाव पुर्व नोटीस

जाहिर नोटीस देणेत येते की, श्री गोपाळ दामोदर पांडे यांनी दि एचसीसीएस अर्बन को ऑ क्रेडिट सोसायटी मधून मालमत्ता तारणांतर्गत कर्ज थकवल्यामुळे त्यांचे विरूध्द वसुली दाखल्यातील आदेश तसेच जप्ती नोटीशीमध्ये नमूद केल्या प्रमाणे जप्तीची कारवाई करून तारण ठेवलेली अनुक्रमे गाळा नंबर ३ व ४, साईसिध्दी अपार्टमेंट, बाळकुम रोड, माजिवाडे, ठाणे- ४००६०१ ही मालमत्ता दिनांक ३१.०८.२०१९ रोजी कायदेशीररित्या जप्त करण्यात आलेली होती. सदर मालमत्तेचा लिलाव दिनांक ०४.०१.२०२१ आणि दिनांक २४.०३.२०२१ रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित करणेत आलेला होता परंतु दोन्ही लिलावाचे दिवशी कोणीही खरेदीदार/बोलीधारक न आल्यामुळे कायदेशीर तरतुदीनुसार ३री संधी म्हणून दिनांक १७.०९.२०२१ रोजी शुक्रवार दुपारी ३.०० वाजता पतसंस्थेच्या कार्यालयीन पत्यावर ठेवण्यात आली आहे तरि इच्छूक खरेदीदार/बोलीधारक यांना जाहीर आवाहन करण्यात येते की ही शेवटची संधी साधून वरील दिवशी लिलावात भाग घ्यावा.

माननिय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे जिल्हा यांच्या कार्यासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत रकमेच्या (अपसेट प्राईस) किंमतीस अधिन राहून सदर मालमत्ता तीच्या जशी आहे जिथे आहे त्या स्थितीत आणि स्वरूपात लिलावाद्वारे जास्तीत जास्त किंमतीच्या बोलीस विक्रीस ठेवण्यात आलेली आहे. इच्छूक खरेदीदार व्यक्तींकडून खालील अटी व शर्तीवर बंद पाकिटातून देकार अर्ज या कार्यालयात दिनांक १६/०९/२०२१ रोजी वा पुर्वी कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहे. सदर अर्जात देकार रक्कम नमूद करण्यात यावी. कमाल (ज्यादा) रकमेच्या देकारास सदर अचल मालमत्ता विक्री करण्यात येईल.

मालमत्तेचा पत्ता: गाळानंबर ३ व ४, एकूण २२८ चौफूट, आधारभूत किंमत एकत्रित रू ४०,५२,०००/- राहिन.

लिलावाचे ठिकाण: दि एचसीसीएस अर्बन को ऑ क्रेडिट सोसायटी लि., ४९६/४९८, सर जे जे मार्ग, जे जे हॉस्पिटल समोर, मुंबई- ४००००८.

लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:

१ ईच्छुक खरेदीदार यांनी दिनांक १६.०९.२०२१ रोजी वा पुर्वी सायंकाळी ५ वाजेपर्यत बंद पाकिटात देकार अर्ज या कार्यालयात आणून द्यावे.
२ दिनांक १६.०९.२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजल्यानंतर आलेले देकाराचे कोणतेही बंद पाकिट स्विकारले जाणार नाही.
३ ईच्छुक खरेदीदाराने देकार अर्जासोबत अनामत रक्कम म्हणून आधारभूत किंमतीच्या १% रक्कमेचा डी डी / बॅंकर्स पेऑर्डर दि एचसीसीएस अर्बन को ऑ क्रेडिट सोसायटी लिमिटेड मुंबई या नावाने काढून जोडावा लागेल.
४ अपुर्ण /आधारभूत किंमतीपेक्षा कमी रक्कम / अनामत रकमेचा डी डी तसेच स्वाक्षरी नसलेले देकाराचे अर्ज नाकारण्याचा हक्क हे कार्यालय राखून ठेवीत आहे.
५ अंतीम देकार / बोली कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय स्विकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार तसेच अंतीम निर्णयाचा हक्क हे कार्यालय राखून ठेवत आहे.
६ अंतीम खरेदीदार म्हणून मंजूरी पत्र मिळाल्यावर खरदीदाराने मंजूरीच्या दिनांकापासून पुढील एक महिन्यात मंजूर बोलीची रक्कम पतसंस्थेत निम्नलिखीत पध्दतीने भरावी अन्यथा खरेदीदाराची मंजूरी रद्द करण्यात येऊन क्रमांक दोनवर असलेला खरेदीदारास संधी दिली जाईल.
७ मंजूरी मिळालेल्या अंतीम खरेदीदाराने बोलीच्या १०% रक्कमेचा धनाकर्ष (डी डी)/ बॅंकर्स पेऑर्डर दि एचसीसीएस अर्बन कोऑ क्रेडिट सोसायटी लिमिटेड मुंबई या नावाने काढून मंजूरी मिळाल्यानंतर दोन दिवसांत पतसंस्थेत जमा करावा.
८ पुढे उरलेल्या रकमेच्या एकचतुर्थांश रक्कम सात दिवसांत भरावी आणि उर्वरित सर्व रक्कम लिलाव दिनांका पासून ३० दिवसांच्या कालावधीत भरावी लागणार आहे अन्यथा मंजूरी रदबद्दल केली जाईल.
९ मंजूर पुर्ण रक्कम पतसंस्थेस प्राप्त झाल्यावर मालमत्तेचे सर्व दस्ताऐवज लिलाव पुर्णत्वाचा दाखला व अंतीम ऑर्डर सहीत खरेदीदारास दिली जाईल.
१० लिलाव तसेच देकार बोली मंजूर किंवा रद्द करण्याचा वा पुढे ढकलण्याचा हक्क हे कार्यालय राखून ठेवीत आहे.
११ देकार धारकांना मालमत्ता अवलोकन करणे कामी ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी जाण्या येण्याचा खर्च स्वत: करावा लागेल. तसेच त्याची पुर्व सुचना पतसंस्थेस आधि द्यावी लागेल.
१२ वसुली विभाग कार्यासनाचा कार्य हेतू केवळ जप्त मालमत्तेचा लिलाव करून पतसंस्थेस येणे असलेली संपुर्ण रक्कम वसूल करून मालमत्तेचा ताबा खरेदीदाराकडे देण्याच्या मर्यादेपर्यंतच राहीन.
१३ मालमत्तेचा ताबा दिल्यानंतर आवश्यक पुढील रजिस्ट्रेशन व इतर बाबींच्या खर्चाची व पुढील कार्य वाहीची जबाबदारी खरेदीदाराची राहिन.
१४ लिलावासाठी ईच्छुक खरेदीदार अथवा किमान आधारभूत किंमतीची बोलीन मिळाल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

(सय्यद सलीम हसन)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
प्राधिकृत

शिक्का



स्थापना १९५२ — नोंदणी क्रमांक २०२७२

**दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई**
म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डी' मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

मुंबई, दिनांक : ०९.०९.२०२१

**नोटीस**

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची एकोणसत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी, दुपारी ४.०० वाजता खालील कामकाजांचा विचार करण्याकरीता ओएव्हीएम (अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स) द्वारे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ३०.०७.२०२१ रोजीच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे बँकेचे नोंदणीकृत कार्यालय, 'म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डी'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१' हे सभास्थान मानण्यात येईल. तरी सदर सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे.

१) दिनांक २२.०३.२०२१ रोजी झालेल्या ६८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.
२) संचालक मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास व वैधानिक हिशेब तपासनीसांनी तपासलेले दि.३१ मार्च २०२१ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांस मान्यता देणे.
३) दिनांक ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ या कालावधीकरीता वैधानिक हिशेब तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व सन २०१९-२०२० च्या वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या नामतालिकेमधील, भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षकांची नोंद घेणे.
५) नफा वाटणीस मंजूरी देणे.
६) बँकेची वसुल न होणारी कर्जे जामिनकी हमी निधी खाते नांवे टाकून निर्लेखित करणे.
७) ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची गैरहजेरी माफ करणे.
८) मृत सभासदांकरीता 'सभासद सुरक्षा योजना' सुरु करणे व त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीस व नियमांस मान्यता देणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने, नियमांस अनुसरुन, आयत्यावेळी येणा-या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकूमावरुन
**वि.ही. रावदका**
**महाव्यवस्थापक**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०९.०९.२०२१

**सूचना**

१) सर्वसाधारण सभेच्या निश्चित केलेल्या वेळी गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल व आवश्यक त्या गणसंख्येच्या अभावीसुध्दा कामकाजाचा विचार केला जाईल. सभेच्या ठरलेल्या वेळेस, जेवढे सभासद, बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर जाऊन सभेस उपस्थित राहतील, त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजताना त्यावेळी ग्राहय धरली जाईल. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
२) सभासदांना वरील कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कामाच्या वेळेत, मुख्य कार्यालयात, महाव्यवस्थापक यांना पूर्वसूचनेनुसार भेटावे.
३) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर लेखी सूचना द्यावी व सभेच्या वेळी संबंधीत विषयावरील चर्चा चालू असताना त्याबाबत विचारणा करावी. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही.
४) दिनांक २२.०३.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत त्याचप्रमाणे सन २०२०-२०२१ वैधानिक हिशेब तपासनीसांचा अहवाल व सन २०१९-२०२० चा वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवाल सभासदांच्या अवलोकनासाठी दिनांक ०९.०९.२०२१ पासून कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती दिनांक ०९.०९.२०२१ पासून सभासदांच्या अवलोकनासाठी कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत ठेवण्यात येतील.
५) ज्या सभासदांनी त्यांचा ई-मेल आय.डी. किंवा मोबाईल क्रमांकाची माहिती बँकेकडे नोंद केली नसेल त्यांनी त्याबाबतची माहिती संबंधीत शाखा कार्यालयात त्वरीत सादर करावी.
६) बँकेच्या www.municipalbankmumbai.com या वेबसाईटवर ६९ वा वार्षिक अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात येत आहे.

नवा काळ
मुंबई ■ गुरुवार ९ सप्टेंबर, २०२१ ■ पान- ८

# अभिनेत्री अलंकृता सहायच्या घरावर दरोडा



**नवी दिल्ली -** मॉडेल-अभिनेत्री अलंकृता सहायला घरात चाकूच्या धाक दाखवून तीन चोरट्यानी तिची रोकड लूटल्याची घटना दिल्लीच्या सेक्टर -२७ मध्ये घडल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर ती प्रचंड घाबरली आणि तिने स्वत:ला वॉशरूममध्ये बंद केले. अलंकृता ही सेक्टर -२७ मध्ये एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहते. तीन अज्ञात मुखवटेधारी चोरांनी अचानक तिच्या घरात जबरदस्तीने दाखल झाले. त्यानंतरअलंकृताला ओलीस ठेवूनचाकूच्या धाकाने ६.५० लाख रुपये लुटली.अलंकृताने मदतीसाठी आरडाओरड केली असता दरोडेखोरांनी बाल्कनीतून उडी मारून पळ काढला. या घटनेनंतर ती प्रचंड घाबरली होती आणि तिने स्वत:ला वॉशरूममध्ये बंद केले होते. अलंकृता सहायने काही दिवसांपूर्वी खरार येथून फर्निचर खरेदी केले होते. त्यापैकी काही वस्तू रविवारी तिच्या भाड्याच्या घरी डिलीव्हर करण्यात आल्या होत्या. दरोडेखोरांपैकी एक जण तिच्या घरी फर्निचर देण्यास आला होता, असा तिला संशय आहे.

# शिवेंद्रराजेंच्या बालेकिल्ल्याला खिंडार समर्थकांच्या गटाचा राष्ट्रवादीत प्रवेश

■ सातारा

**दिवंगत** आमदार अभयसिंहराजे भोसले यांच्या काळापासून त्यांच्यासोबत राहिलेला सातारा तालुक्याचा पश्चिम भाग शिवेंद्रराजेंसोबत कायम होता. मात्र अलीकडे येथील राजकीय समीकरण बदलले आहे. त्यामुळे शिवेंद्रराजे भोसले यांच्या परळीतील अनेक पाठीराख्यांनी भाजपला रामराम करून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे शिवेंद्रराजे यांच्या बालेकिल्ल्याला खिंडार पडले आहे. सातारा तालुक्याचा पश्चिम भाग हा नेहमीच शिवेंद्रराजे आणि त्यांचा वडिलांसोबत कायम राहायला. ते कोणत्याही पक्षात गेले तरी त्यांची ही ताकद कायम होती.



मात्र आता एककेंद्री सत्तेमुळे त्यांचे अनेक कार्यकर्ते नाराज झाले आहेत. बाहेरच्यांनी जावळीत लक्ष घालू नये, असे वक्तव्य शिवेंद्रसिंहराजे यांनी केले होते. त्यावर राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे यांनी कोण बाहेरचे आणि कोण स्थानिक, असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर आता परळीतील शिवेंद्रराजे समर्थकांचा एक मोठा गट राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये दाखल झाला आहे. एवढेच नाही तर नजिकच्या काळात आणखी काही कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. यामुळे कधी नव्हे ते शिवेंद्रराजे यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत परळीतील शिवेंद्रराजे समर्थकांच्या गटाने राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.

# कल्याण डोंबिवली पालिकेच्या अधिकाऱ्यांवर बिल्डरचा लाच घेतल्याचा आरोप

■ कल्याण

**दावडी** येथील सहा मजली बेकायदा इमारतीवर कारवाई न करण्यासाठी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी माझाकडुन २७ लाखांची लाच घेतल्याचा आरोप बिल्डरने केला आहे. या आरोपामुळे बेकायदा बांधकामांच्या विरोधात कारवाई करणारे विभाग पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. बिल्डर आणि अधिकाऱ्यांच्या एका हॉटेलमधील भेटीचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे. याप्रकरणाची कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी गंभीर दखल घेतली असून दोषींविरोधात कारवाई करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दावडीतील डीपी रस्त्याच्या परिसरात सहा मजली बेकायदा इमारतीवर मनपा प्रशासनाने चार दिवसांपूर्वी कारवाई केली. त्यानंतर बिल्डर मुन्ना सिंग यांनी आरोप केला आहे की, इमारतीवर कारवाई न करण्यासाठी अधिकाऱ्यांनी माझाकडून लाखो रुपये घेतले आहेत. कारवाईपूर्वी अधिकारी अनंत कदम आणि दीपक शिंदे यांची एका हॉटेलमध्ये बैठक झाली. या अधिकाऱ्यांनी आयुक्तांच्या नावानेही पैसे घेतले आहेत. पैसे घेऊनही इमारतीवर कारवाई केली आहे.

# प्रताप सरनाईक संबंधित एनएसईएल प्रकरणी ईडीला हायकोर्टाचा दणका

■ मुंबई

**शिवसेना** आमदार प्रताप सरनाईकांशी संबंधित एनएसईएल प्रकरणी ईडीला मुंबई उच्च न्यायालयाने दणका दिला आहे. या प्रकरणातील आरोपी योगेश देशमुख यांचा जामीन रद्द करण्यासाठी तपासयंत्रणेने दाखल केलेली याचिका हायकोर्टाने फेटाळून लावली आहे. विकासक योगेश देशमुख हे शिवसेना आमदार प्रताप सरनाईकांचे निकटवर्तीय समजले जातात. योगेश देशमुख यांना ईडीने मनी लॉंड्रींग प्रकरणी अटक केली होती. बुधवारी न्यायमूर्ती एस.एस. शिंदे आणि न्यायमूर्ती एन. जमादार यांनी आपला राखून ठेवलेला निकाल जाहीर केला. दरम्यान, एनएसईएल म्हणजेच



नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड प्रकरणात यावर्षी एप्रिल महिन्यात विकासक योगेश देशमुखला अटक करण्यात आली होती, मात्र पुढे पीएमएलए कोर्टाने त्यांची जामीनावर सुटका केली होती. हाच जामीन रद्द करण्यासाठी ईडीने मुंबई उच्च न्यायालयात या निकालाला आव्हान दिले होते जे फेटाळण्यात आले. सुमारे ५,५०० कोटींच्या आर्थिक घोटाळ्याशी संबंधित हे प्रकरण आहे. देशमुख हे प्रताप सरनाईक यांचे निकटवर्तीय असल्याचे सांगत ईडी आता त्यांच्या मागे असल्याचा दावा भाजपाचे माजी खासदार किरिट सोमय्या यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला होता. 'आस्था ग्रुप' या काळ्या यादीतील कंपनीसोबत एनएसईएलमध्ये २५० कोटींची अफरातफर केल्याचा आरोप सरनाईक यांच्या विहंग ग्रुपवर ठेवण्यात आला आहे.

# गुहागरच्या जहाजाचे गूढ उकलले ‘एल अँड टी’चे असल्याचा खुलासा

■ रत्नागिरी

**गुहागरच्या** समुद्रकिनाऱ्यावर आढळलेले महाकाय जहाज ‘एल अँड टी’ कंपनीचे असल्याचे आणि त्यात कोणतेही धोकादायक सामान किंवा कर्मचारी



नसल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचा जीव भांड्यात पडला. हे १५० फूट लांबीचे अजस्त्र जहाज आहे, असे रत्नागिरी जिल्हा मेरिटाईम बोर्डाचे प्रादेशिक अधिकारी संजय ओगलमोगले यांनी सांगितले.

‘एल अँड टी’ कंपनीचे हे जहाज वीज निर्मिती करणाऱ्या कंपनीशी संबंधित आहे. ते दोरखंडाने बांधले होते. परंतु तो तुटल्यामुळे ते भरकटले आणि गुहागरच्या किनाऱ्यावर आले. त्यामुळे या परिसरात उलट-सुलट चर्चा सुरू झाली होती. या जहाजावर कोणत्याही धोकादायक वस्तू आढळलेल्या नाहीत. त्यावर कर्मचारीही नव्हते. ते मनुष्यविरहित आहे. केवळ कामाचे सामान ठेवण्याचे हे जहाज आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही. वारा आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन कंपनी हे जहाज योग्य ठिकाणी लवकरच हलवेल. तशा सूचना कंपनीला दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पांच्या कामाला गती द्यावी! मुख्यमंत्र्यांचे निर्देश

■ मुंबई

**मुंबईतील** वरळी, नायगाव व ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पांच्या कामाला गती द्यावी असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज बीडीडी चाळ उच्चाधिकार समितीची बैठक वर्षा येथील समिती कक्षात संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड, मुख्य सचिव सीताराम कुंटे,



मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ.योगेश म्हसे व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बी.डी.डी. चाळीमधील पोलीस सेवा निवासस्थानांचा ताबा म्हाडास हस्तांतरीत करणे, बी.डी.डी. चाळीमध्ये १ जानेवारी २०११ रोजी पर्यंत जे पोलीस कर्मचारी पोलीस सेवा निवासस्थानात वास्तव्यास आहेत, त्यांना बी.डी.डी. पुनर्विकासांतर्गत ५०० चौ.फु. क्षेत्रफळाचा पुनर्विकसित गाळयाचे वितरण बांधकाम खर्चाची रक्कम आकारून देण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. यासंदर्भात गृह विभागासमवेत स्वतंत्र बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांची यादी घेतली जावी असे आजच्या बैठकीत निश्चित करण्यात आले.

# २७ सप्टेंबरच्या ‘भारत बंद’मध्ये कामगार संघटनाही सहभागी होणार

■ नवी दिल्ली

**मोदी** सरकारच्या ३ कृषी कायद्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी पुकारलेल्या २७ सप्टेंबरच्या ‘भारत बंद’मध्ये कामगार संघटनाही सहभागी होणार आहेत. इंटक, सिटू, एआयटीयुसी एचएमएस, एआयसीसीटीयू, एआययुटीयुसी आदी देशातील सर्व कामगार संघटना व फेडरेशन आणी १९ राजकीय पक्ष या ‘भारत बंद’मध्ये सहभागी होणार आहेत, असे कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे (महाराष्ट्र राज्य) सहनिमंत्रक विश्वास उटगी यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांचे नेते राकेश टिकैत यांनी रविवारी किसान महापंचायतीत २७ सप्टेंबरला कृषी कायद्यांच्या विरोधात भारत बंदची घोषणा केली आहे. हे काळे कायदे सरकार मागे घेत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन संपणार नाही. मग आम्ही शहीद झालो तरी चालेल. पण हे आंदोलन सुरूच राहील, असे त्यांनी सांगितले होते. ९ महिन्यांपासून दिल्लीच्या सीमांवर कृषी कायद्याच्या विरोधात शेतकरी आंदोलन करत आहेत. परंतु २२ जानेवारीपासून केंद्र सरकारने त्यांच्यासोबत कोणतीही चर्चा केलेली नाही. या आंदोलनात शेकडो शेतकरी शहीद झाले आहेत. त्यामुळे हा लढा आणखी तीव्र करण्यासाठी त्यांनी २७ सप्टेंबरला भारत बंदची हाक दिली आहे. त्यात इंटक, सिटू आदी कामगार संघटना आणि १९ राष्ट्रीय राजकीय पक्ष सहभागी होणार आहेत. त्यामुळे हा भारत बंद व्यापक होण्याची शक्यता आहे.

# सिंहगडावर विश्रामगृह व शिवसृष्टी जिल्हा परिषदेचा महत्वाचा प्रस्ताव



■ पुणे

**इतिहासातील** एक महत्त्वाचा किल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंहगडावर भव्य विश्रामगृह आणि विशाल शिवसृष्टी साकारण्याचा प्रस्ताव पुणे जिल्हा परिषदेने तयार केला आहे. ७ कोटींच्या या प्रस्तावाच्या आराखड्याचे सादरीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर करण्यात आले. त्यात त्यांनी काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार दुरुस्त्या केल्यानंतर पुन्हा त्याचे सादरीकरण होणार आहे. नंतर त्याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

इतिहासप्रेमी आणि पर्यटकांचे आवडते ठिकाण म्हणून सिंहगड प्रसिद्ध आहे. या किल्ल्यावरील जुनी इमारत पाडून केल्या जाणाऱ्या पुनर्विकासात शनिवारवाडा, विश्रामबागवाडा यांच्या वास्तू रचनेचे दर्शन घडवणारी इमारत बांधण्याचा प्राथमिक आराखड्यात प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. इतिहासकार, वास्तुरचनाकार, पर्यटन, वन आणि इतर विभागांची मते जाणून घेतल्यानंतर या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. पुनर्विकासानंतरही सिंहगड किल्ल्यावर संस्कृतीचे दर्शन घडेल. शिवशाही काळातील वास्तुरचना, ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा हा एक प्रयत्न आहे.



# सेलमॉन भॉई गेमवर तात्पुरती बंदी सलमान खानला न्यायलयाकडून दिलासा

■ मुंबई

**अभिनेता** सलमान खानच्या २००२ मधील हिट अँड रन घटनेवर आधारित असलेला 'सेलमॉन भॉई' या ऑनलाईन मोबाईल गेमवर तात्पुरती बंदी आणण्याचा आदेश शहर दिवाणी न्यायालयाने दिला. गुगल प्ले स्टोअरवरुनही या गेमबाबत सर्व साहित्य तातडीने काढून टाकण्याचे आदेश न्यायालयाने गेम तयार करणाऱ्या कंपनीला आणि गुगल एलएलसीला दिले. न्यायालयाच्या निर्णयामुळे अभिनेता सलमान खानला मोठा दिलासा मिळाला. सलमानने गेल्या महिन्यात न्यायालयात केलेल्या दाव्यावर अतिरिक्त सत्र न्या. के एम जयस्वाल यांच्यासमोर सुनावणी झाली. सलमानच्या संबंधित अथवा साधर्म्य असलेला कोणताही मजकूर गेमचे निर्माते पॅरडी स्टुडिओ प्रा. लि. आणि त्याच्या दिग्दर्शकांनी प्रदर्शित किंवा पुनर्प्रदर्शित करु नये, असे प्रतिबंधक आदेशही न्यायालयाने दिले. या ऑनलाईन गेमची तपासणी केली असता सलमानने केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आणि समानता आढळत आहे.

# शरद पवारांनी घेतली निवडणुकीत तिकीट दिलेल्या उमेदवारांची बैठक

■ मुंबई

**विधानसभा** आणि लोकसभा निवडणुकीसाठी अजून तीन वर्षे बाकी आहेत. मात्र, राष्ट्रवादी कॉंग्रेसने आतापासून निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज आजी-माजी आमदारांसह विधानसभा निवडणुकीत तिकीट दिलेल्या सर्व ११४ उमेदवारांसोबत चर्चा केली. यावेळी प्रत्येक मतदारसंघाचा आढावा त्यांनी घेतला. तसेच सर्वांच्या तक्रारी आणि सूचनाही यावेळी शरद पवार यांनी ऐकून घेतल्या. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये ही बैठक पार पडली. या बैठकीनंतर बोलताना राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि मंत्री नवाब मलिक म्हणाले की, २०१९च्या निवडणुकीत ११४ उमेदवारांना तिकीट दिले होते. त्यांची आज बैठक पार पडली. या बैठकीला खासदार, मंत्रीही उपस्थित होते. यावेळी एकूण ५५ लोकांनी आपली मते मांडली. मतदारसंघातील परिस्थिती, तिथले प्रश्न आदी मुद्दे त्यांनी बैठकीत मांडले. तसेच सरकारकडून असलेल्या अपेक्षाही व्यक्त केल्या. ते पुढे म्हणाले की, तीन पक्षांचे सरकार असताना प्रत्येक पक्ष आपल्या आमदारांना झुकते माप देते. दोन पक्षांचे सरकार असताना हीच तक्रार होती. कधीकधी एका पक्षाचे सरकार असताना पण तक्रार असते. तीन पक्षाचे सरकार असल्याने प्रत्येक प्रश्न सुटेल असे नाही. जे आमदार आहेत किंवा पराभूत उमेदवार आहेत. यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर राष्ट्रवादीचे मंत्री त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देतील. काही जिल्ह्यांमध्ये आम्ही पालकमंत्री असताना किंवा आमचे वर्चस्व असताना कॉंग्रेसच्या तक्रारी येऊ शकतात. काही जिल्ह्यांमध्ये कॉंग्रेसचे वर्चस्व असताना आमच्या किंवा शिवसेनेच्या तक्रारी होऊ शकतात. जिथे जिथे एक पक्षाचे सरकार आहे. त्या ठिकाणीही आमदारांचे मतभेद असतात. प्रत्येक आमदाराला आणि नेत्यांना असे वाटते आपल्या मतदारसंघातील कामं जास्त झाली पाहिजेत. हा काही मोठा प्रश्न असे आम्ही मानत नसल्याचे त्यांनी सांगितले.

# नागपूर विद्यापीठाची ‘अ’ श्रेणी कायम

**नागपूर -** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक) ‘अ’ श्रेणी दिली. कोरोनामुळे दोन वर्षांपासून विस्कटलेली शैक्षणिक व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी असताना विद्यापीठाने ‘अ’ श्रेणी कायम राखली आहे. २ ते ४ सप्टेंबर या कालावधीत नॅक चमूने विद्यापीठास मूल्यांकन देण्याच्या अनुषंगाने भेट दिली होती. प्रशासनानेही कोरोना नियमांचे पालन करून भेटीचे उत्तम नियोजन केले होते. यासाठी विविध समित्या तयार केल्या होत्या. पहिल्या दिवसाच्या भेटीत १२ विभागांचे सादरीकरण झाले तर दुसऱ्या दिवशी १५ विभागांनी सादरीकरण केले. समितीने विद्यार्थी, पालक, संशोधक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी नॅकच्या चमूने संवाद साधला. तसेच विविध विभागांना भेटी, प्रयोगशाळा पाहणी, पायाभूत सुविधा, ग्रंथालय भेटी देण्यात आल्या.

## २५ वा स्मृतिदिन



**कै.श्री.नामदेवराव रामभाऊ मांढरे**
(मृत्यू दि.९/९/१९९६)
भावपूर्ण श्रद्धांजली
श्रीमती लता नामदेवराव मांढरे
श्री. सुनिल नामदेवराव मांढरे
आणि मांढरे परिवार
क्रांतीसिंह नाना पाटील मंडई दादर, मुंबई
क्रांतीसिंह नाना पाटील व्यायामशाळा (रजि.) दादर, मुंबई
क्रांतीसिंह नाना पाटील घाऊक व्यापारी संघ (रजि.) तुर्भे,नवी मुंबई

## श्रद्धांजली

दहावा स्मृति दिन



**कै. श्रीमती सरस्वती गणपत कोतेरे** (मृत्यु दि. 09.09.2011)
आज तुम्ही जाऊन दहा वर्ष झाले, परंतु या काळावधीत तुमची आठवण आली नाही असा एक ही दिवस गेला नाही, तुमच्या आत्मास चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना

मुलगा- दिलीप, संजय
सून- निता, संगिता
नातवंडे- अनिकेत, यश, पुजा, अंकिता, प्राची
कोतेरे परिवार आणि आप्तेष्ट
Kohinoor Elevators Pvt. Ltd.

# पेंग्विनच्या खर्चासाठी काढलेले ‘ते’ टेंडर पालिकेने मागे घेतले

■ मुंबई

**भायखळा** येथील राणीच्या बागेतील पेंग्विनच्या देखभालीसाठी पालिकेने काढलेले १५ कोटी रुपयांचे टेंडर अखेर मागे घेतले. पालिकेच्या या टेडरला कॉंग्रेससह भाजपा आणि मनसेने विरोध केला होता. या प्रखर विरोधानंतर अखेर हे टेंडर पालिकेकडून मागे घेण्यात आले आहे. आता पेंग्विनची देखभाल पालिका प्रशासनाच्या अखत्यारित करावी असे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. दक्षिण कोरियातून २०१७ साली राणीबागेत आठ हम्बोल्ट पेंग्विन आणण्यात आले होते. त्यापैकी एकाचा त्यावेळी दोन महिन्यांतच मृत्यू झाला होता. सध्या राणीच्या बागेत सात मोठे पेंग्विन असून दोन पिल्ले आहेत.

पेंग्विनच्या देखभाल व आरोग्य व्यवस्थापनासाठी महापालिकेने सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षासाठी तब्बल १५ कोटी रुपये खर्चाचे टेंडर मागवले होते. ही रक्कम पेंग्विन प्रदर्शनाची देखभाल आणि वातानुकुलित सुविधा, लाइफ सपोर्ट आणि इलेक्ट्रिकल सिस्टीम, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा आणि पेंग्विनसाठी मासे, अन्न पुरवण्यासाठी खर्च केली जाणार असल्याचे सांगण्यात येत होते. याला कॉंग्रेसचे महापालिकेतील विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी विरोध केला होता. आपल्याकडे मुंबई महापालिकेचे डॉक्टर्स, कर्मचारी आहेत. हे सर्व शिकलेले आहेत. मग कशासाठी तुम्ही टेंडर काढता. कुठे ना कुठे महापालिका कंत्राटदाराच्या घशात कसा पैसा द्यायला पाहिजे यासाठी टेंडर काढत असल्याचे दिसून येत आहे, असा आरोपही रवी राजा यांनी केला. भाजपानेही पालिकेच्या टेंडरला विरोध केला होता.

# यूपीच्या निवडणुकीत मायावतींचे ब्राह्मण कार्ड! सुरक्षेचे आश्वासन

■ लखनऊ

**उत्तर** प्रदेशातील आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन सर्वच राजकीय पक्षांनी व्यूहरचना आखण्यास सुरुवात केली आहे. त्यात बहुजन समाजवादी पार्टीही मागे नाही. बसपाच्या नेत्या मायावती यांनी या निवडणुकांमध्ये ब्राह्मण कार्डचा वापर करण्याचे ठरवले आहे. त्यानुसार त्यांनी लखनऊमधील कार्यक्रमात आमचे सरकार सत्तेवर आले तर ब्राह्मणांना सुरक्षा देईल, असे आश्वासन दिले आहे. उत्तर प्रदेशात सध्या भाजपचे सरकार आहे. त्यांच्या कार्यकाळात ब्राह्मणांवरील अत्याचार वाढले आहेत. त्यांच्यावर केलेल्या कारवाईची चौकशी केली जाईल. राज्यात सत्ता येण्यापूर्वी ब्राह्मणांचा प्रत्येक शब्द ऐकला गेला आहे. बसपा हा एकमेव असा पक्ष आहे की जो सर्वांचे हित आणि सर्वांच्या सुखासाठी काम करत आहे. जे सांगतो त्याच्याशी प्रामाणिक राहतो. दिलेली आश्वासने कसोशीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. आम्ही उत्तर प्रदेशात ४ वेळा सरकार चालवून हे दाखवले आहे.

कोलेस्ट्रॉल आणि हार्ट ब्लॉकेजमध्ये फायदेशीर क्लियर हार्ट
लसूण : कोलेस्ट्रोल व बी.पी.ला सामान्य व हार्ट ब्लॉकेज उघडण्यास मदत करते.
आले : रक्त पातळ करने व वेदना कमी करते.
अर्जुन छाल: हार्टच्या आर्टरीज़ला बळकट करण्यासाठी आणि ब्लड प्रेशर कंट्रोल करण्यात फायदेशीर आहे.
एप्पल सायडर व्हिनेगर : शरीराच्या सर्व नसांना उघडण्यास, पोट साफ करण्यास, थकवा घालविण्यास, मदत करते.
दालचिनी : शरीरातील रक्तवाहिन्यांमधील कोलेस्ट्रोल आणि ब्लडमधील शुगर कमी करण्यासाठी फायदेशीर.



वापर : दररोज सकाळी नाश्त्या अगोदर गरम पाण्या सोबत क्लियर हार्ट लिक्विड घ्या आणि क्लियर हार्ट प्लस कॅप्सूल सकाळी आणि संध्याकाळी जेवणानंतर घ्या आणि आश्चर्यकारक परिणाम मिळवा.
Clear Heart
Liquid + Capsule
Available at all chemist
Helpline : 9320450045